


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४७ ■ मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## रमजान महिन्यात पाकचा अफगाणिस्तानवर हवाई हल्ला....!

## 400 जणांचा मृत्यू 250 जखमी



### रमजान महिन्यात अशा प्रकारचा हल्ला दूःखद

अफगाणिस्तानचा क्रिकेटर राशिद खानने पाकिस्तानी हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आहे. त्याने सोशल मीडियावर लिहिले की, काबुलमध्ये नुकत्याच झालेल्या हवाई हल्ल्यांमुळे लोक दुःखी आहेत. या हल्ल्यांमध्ये अनेक सामान्य नागरिकांचा जीव गेला. काही हल्ले घरे, शाळा आणि रुग्णालयांच्या आसपासही झाले. सामान्य नागरिकांच्या वस्त्यांवर हल्ला करणे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार युद्ध गुन्हा मानला जातो, तो जाणूनबुजून केला असो वा चुकून. विशेषतः रमजानच्या पवित्र महिन्यात अशा घटनेमुळे लोकांमध्ये अधिक दुःख आणि संताप आहे. लोकांनी संयुक्त राष्ट्र आणि मानवाधिकार संघटनांकडे मागणी केली आहे की या प्रकरणाची सखोल चौकशी केली जावी आणि जे कोणी जबाबदार असतील त्यांना शिक्षा केली जावी.

पाकिस्तानने रविवारी रात्री कंधार प्रांतात हवाई हल्ला करून दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य केल्याचा दावा केला होता. पाकिस्तानने ही कारवाई 'गजब-लिल-हक' ऑपरेशन अंतर्गत केली. याला प्रत्युत्तर म्हणून अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने पाकिस्तानच्या लष्करी छावणीवर हल्ला केला. पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांच्या मते, या हल्ल्यात अशा ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले, ज्यांचा वापर पाकिस्तानी तालिबान सारख्या संघटना सीमापार हल्ल्यांची तयारी करण्यासाठी करत होत्या. पाकिस्तानने असाही आरोप केला आहे की, शुक्रवारी रात्री अफगाणिस्तानकडून ड्रोन हल्ला करण्यात आला होता, ज्याचा मलबा पडल्याने क्वेटामध्ये दोन मुलांसह काही नागरिक जखमी झाले.

रुग्णालय आणि रहिवाशी भागत हल्ला केल्याचा अफगाणिस्तानचा दावा पाकिस्तानने फेटाळून लावला. हा दावा खोटा असून, जनमताची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने करण्यात आला आहे, असे पाकिस्तानने म्हटले आहे. काबूलमधील कोणत्याही रुग्णालयाला लक्ष्य करण्यात आले नसल्याचे पाकिस्तानने स्पष्ट केले. पाकिस्तानच्या माहिती मंत्रालयाने एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, या हल्ल्यांमध्ये अफगाण तालिबानच्या लष्करी तळांना आणि दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या पायाभूत सुविधांना अचूकपणे लक्ष्य करण्यात आले, ज्यात तांत्रिक उपकरणे आणि दारूगोळ्याच्या गोदामांचा समावेश होता. या ठिकाणांचा वापर निष्पाप पाकिस्तानी नागरिकांविरुद्ध केला जात होता, असेही पाकिस्तानकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

वृत्तसंस्था १७ मार्च

**काबुलः** पाकिस्तानने सोमवारी रात्री पुन्हा एकदा अफगाणिस्तानवर हवाई हल्ला केला आहे. पाकिस्तानी हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी राजधानी काबुलमधील अनेक भागांना लक्ष्य केले, ज्यात एक रुग्णालय देखील होते. रॉयटर्स वृत्तसंस्थेनुसार, यात ४०० लोकांचा मृत्यू झाला असून, २५० हून अधिक जखमी झाले आहेत. वृत्तानुसार, दारुलअमान, अरजान किंमत, खैरखाना आणि काबुल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आसपास अनेक ठिकाणी स्फोट आणि गोळीबाराचे आवाज ऐकू आले.

तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी आरोप केला आहे की, पाकिस्तानी सैन्याने काबुलमधील एका व्यसनमुक्ती रुग्णालयावर बॉम्ब टाकले. तालिबानने या हल्ल्याचा तीव्र निषेध करत याला मानवतेविरुद्धचा गुन्हा म्हटले आहे आणि पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या हवाई हद्दीचे उल्लंघन केल्याचे म्हटले आहे. तर, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे प्रवक्ते मोशर्रफ जैदी यांनी हे आरोप निराधार असल्याचे म्हटले आणि काबुलमधील कोणत्याही रुग्णालयाला लक्ष्य केले नसल्याचे सांगितले.

जेव्हा मीडियाची पथके तिथे पोहोचली, तेव्हा रुग्णालयाच्या काही भागांमध्ये अजूनही आग लागलेली होती. सुमारे ३० हून अधिक मृतदेह स्ट्रेचरवर बाहेर काढले जात होते. रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, तिथे खूप जास्त रुग्ण होते, त्यामुळे मृतांची आणि जखमींची संख्या खूप जास्त असू शकते. पाकिस्तानच्या या एअरस्ट्राईकवर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. याचदरम्यान, पाकिस्तानकडून पुन्हा नापाक हरकत सुरु आहे. काबूलमधील दहशतवादांच्या स्थळावर हल्ला केला असून रुग्णालयांवर हल्ला केला नसल्याचा दावा पाकिस्तानकडून करण्यात येत आहे. अफगाणिस्तान खोटं बोलत असल्याचा आरोपही पाकिस्तानने केला आहे.

## गॅस सिलिंडरचा काळाबाजार

### जिल्ह्यात पुरवठा विभाग 'ॲक्शन मोड'वर!



प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** गॅस सिलिंडरचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात वाढला असून, काळाबाजारात घरगुती सिलिंडरसाठी १५०० ते १८०० रूपये मोजावे लागत आहे तर व्यावसायिक सिलिंडरसाठी ३००० हजार रूपये द्यावे लागत असल्याचे सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे आहे. एककीकडे गॅस एजन्सींसमोर तासनतास रांगा लावूनही सिलिंडर मिळत नसल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत. तर दुसरीकडे पुरवठा विभागही ॲक्शन मोडवर आला असून, जिल्ह्यात कारवाया सुरू केल्या आहेत. सोमवारी पाच ठिकाणी कारवाया करीत ३० घरगुती वापराचे गॅस सिलिंडर जप्त केले आहेत. मात्र त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत मात्र मौन बाळगून आहेत. त्यामुळे गॅसचा अवैध वापर करणाऱ्यांचे फावत आहे. देशात 'एस्मा' कायदा लागू असताना व पुरवठा विभाग कारवाई करीत असतानाही एकावरही अद्याप या कायद्यानुसार कारवाई का करण्यात आली नाही, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

मध्य पूर्वेतील युद्धाचा परिणाम संपूर्ण राज्यसह अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. एकीकडे घरगुती गॅस सिलिंडरसाठी नागरिकांना रांगेत तासनतास वाट पाहावी लागत आहे तर दुसरीकडे गॅस सिलिंडरची काळाबाजारी करणाऱ्यांची संख्या सुद्धा वाढली आहे. यावर अंकुश ठेवण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी विशेष पथके स्थापित करीत गॅस सिलेंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी यांना दिले आहे. त्या अनुषंगाने सोमवारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या मार्गदर्शनात अकोला शहरातील फिरदोस कॉलनी येथील सीएससी सेंटर छापा टाकला

### जिल्ह्यात अशा करण्यात आल्या कारवाया

१६ मार्च रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार यांच्या पथकाने १६ व्यावसायिक प्रतिष्ठानांची तपासणी केली. यातील २ ठिकाणांवर कारवाई करीत २३ घरगुती गॅस सिलिंडर जप्तची कारवाई करण्यात आली. यामध्ये एचपीचे ९ तर इण्डेनचे १४ सिलिंडरचा समावेश आहे. तसेच अकोट तालुक्यात अंजली घरडे यांच्या पथकाने १२ प्रतिष्ठानांना भेटी दिल्या असता ३ व्यावसायिक प्रतिष्ठानांवर कारवाई करण्यात आली. यात ७ एचपीचे सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे गॅसचा अवैध वापर व साठा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606 7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250 8788432278

**सेल्समॅन पाहिजे**

सन ऑप्टिकल मध्ये ई कॉमर्स ऑपरेटर ऑप्टिकल सेल्समॅन पाहिजे
- भेटण्याची वेळ दुपारी १२ ते ५
- संपर्क-
मो. 8888867287

**भाड्याने देणे आहे**

महिला व मुलीसाठी एक रुम बाथरुम संडास अटॅच एक दुकान १० बाय १० रोड टच भाड्याने देणे आहे.
- पत्ता-
जवाहर गेट, परकोटच्या आत साबनपुरा, अमरावती.
9403005251

## अपुऱ्या झोपेमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात

### कुलर सोडाच, पण अकोला आगारात साधी गादीही मिळेना; कर्मचाऱ्यांचे जमिनीवर मरण हाल!





## 'लाल परी'च्या सारथींचा नरकवास!

### परिवहन मंत्र्यांनी एकदा अकोल्यात येऊनच पहावे!








प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** राज्याची जीवनवाहिनी समजली जाणारी एसटी धावण्यासाठी दिवस-रात्र कष्ट उपसणाऱ्या वाहक आणि चालकांच्या नशिबी मात्र अकोला आगारात 'वनवास' आला आहे. आगारातील विश्रांतीगृहाची अवस्था इतकी दयनीय आहे की, या उन्हाळ्यात चालकांना साध्या गाद्यांशिवाय चक्क जमिनीवर झोपावे लागत आहे. परिवहन मंत्र्यांनी केवळ घोषणा न करता एकदा अकोल्यात येऊन या कर्मचाऱ्यांची व्यथा पहावी, असा संताप आता व्यक्त होत आहे.

अकोला विभागातून लाखो रुपयांचा महसूल दररोज जमा होतो, मात्र ज्या कर्मचाऱ्यांच्या जिवावर हा महसूल मिळतो, त्यांच्या मूलभूत गरजांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. 'आम्ही राबायचे किती आणि सोसायचे किती?' असा सवाल आता एसटी कर्मचारी विचारत आहेत. 'लाखो प्रवाशांना सुरक्षित इच्छित स्थळी पोहोचवणारे एसटीचे चालक आणि वाहक स्वतः मात्र असुरक्षित आणि अस्वच्छतेच्या विळख्यात अडकले आहेत. अकोला बसस्थानकातील विश्रामगृहाची अवस्था पाहिल्यावर प्रश्न पडतो की, हे विश्रामगृह आहे की एखादा उकिरडा? पिण्याच्या पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती, डासांचा उच्छाद आणि चक्क नैसर्गिक विधींसाठीही खिशातून पैसे मोजावे लागणारी ही विदारक स्थिती. अनेक दिवसांपासून गाद्यांची सोय नसल्याने लांब पल्ल्याच्या गाड्या घेऊन येणाऱ्या चालकांना सिमेंटच्या थंड जमिनीवर किंवा पत्र्याच्या शेडखाली झोपावे लागत आहे.

अकोला बसस्थानकातील हे विश्रामगृह सध्या 'नरकवासा'चे दुसरे नाव ठरत आहे. ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांनी विश्रांती घेणे अपेक्षित आहे, तिथे कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

डस्टबिन ओसंडून वाहत असून, याच दुर्गंधीत आणि कचऱ्याच्या सानिध्यात चालकांना झोपावे लागत आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, येथे पिण्याच्या पाण्याची थेंबभरही सोय नाही. गेल्या ८ दिवसांपासून पाण्याचे नळ कोरडे ठाक पडले आहेत. घसा कोरडा पडला तरी पिण्यासाठी पाणी मिळत नाही, अशी भीषण स्थिती अकोल्यात निर्माण झाली आहे. पाणी नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना बाहेरील 'सुलभ' शौचालयाचा आधार घ्यावा लागतोय. पण इथे खरी शोकांतिका आहे. आधीच तुटपुंज्या पगारावर राबणाऱ्या या कर्मचाऱ्यांना प्रत्येक वेळी १०-१० रुपये देऊन नैसर्गिक विधी उरकावे लागत आहेत. दिवसातून चारवेळा गेले तरी ४० रुपये खिशातून जातात. प्रशासनाच्या चुकीची शिक्षा कर्मचाऱ्यांच्या खिशाला का? हा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

रणरणत्या उन्हात अकोल्याचा पारा ४२ अंशांवर जातो, मात्र या विश्रामगृहात ना कुलर आहे, ना धड पंखे. रात्रीच्या वेळी डासांनी इतका उच्छाद मांडला आहे की, कर्मचाऱ्यांना रात्र जागून काढावी लागते.

अपुऱ्या झोपेमुळे चालकांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि पर्यायाने प्रवाशांच्या सुरक्षेवर टांगती तलवार निर्माण झाली आहे. या संपूर्ण ढिसाळ कारभाराबाबत जेव्हा बसस्थानक प्रमुखांना जाब विचारण्यात आला, तेव्हा नेहमीप्रमाणे 'लवकरच सुधारणा करू' असे गुळगुळीत उत्तर मिळाले. मात्र, ही 'लवकर'ची तारीख नक्की कधी उजाडणार? प्रशासनाच्या या आडमुठ्या धोरणामुळे चालक-वाहक संतापले आहेत. आता तरी परिवहन मंत्र्यांचे लक्ष या अकोल्याच्या 'नरकवासा'कडे जाणार का? की कर्मचाऱ्यांचे हाल असेच सुरू राहणार?

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## चिखलदरा येथे कौशल्य विकास केंद्राचा रोजगार मेळावा सोमवारी

**अमरावती:** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे आयोजन सोमवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी सिपना महाविद्यालय, चिखलदरा, ता. चिखलदरा जि. अमरावती येथे करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडल करिअर सेंटरतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. जिल्ह्यातील युवकांना नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळाव्यामधून प्रयत्न करण्यात येतो. मेळाव्यात योजनेसाठी विविध आस्थापना, कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

## साडे दहा लाखाचे ५३ हरवलेले मोबाईल शोधून मूळ मालकांना परत

### ◆ गाडगेनगर पोलिसांची मोठी कामगिरी

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती :** गाडगेनगर पोलीस स्टेशनने उत्कृष्ट कामगिरी करत हरवलेले तब्बल ५३ मोबाईल शोधून काढले असून त्यांची एकूण किंमत अंदाजे १० लाख ४० हजार रुपये आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी २०२६ दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे ऍं इर्ढ्रूत् चा वापर करून या मोबाईलचा शोध घेण्यात आला.

या यशस्वी कारवाईनंतर दिनांक १६ मार्च २०२६ रोजी पोलीस स्टेशनमध्ये आयोजित कार्यक्रमात पोलीस उप-आयुक्त गणेश शिंदे, सहा. पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, ठाणेदार गोरखनाथ जाधव, दुय्यम ठाणेदार विजया पंधरे आणि पोनि समाधान वाठोरे यांच्या हस्ते तक्रारदारांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल सुरक्षित मिळाल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त करत गाडगेनगर पोलिसांचे आभार मानले.



ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपआयुक्त गणेश शिंदे., सहा. पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे, वपोनि गोरखनाथ जाधव, काईम पोनि विजया पंधरे व प्रशासन पोनि समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत डि.बी. पथक प्रमुख सपोनि मनोजकुमार मानकर, सफौ अशोक वाटाणे, प्रकाश मेश्राम, पोहवा निलेश जुनघरे, अमोल यादव, नपोका विनोद मालवे, पोशि सिध्दार्थ शृंगारे व सचिन गौरखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अमरावती पोलिसांच्या वतीने मॉक ड्रिल

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती :** दिनांक १४/०३/२०२६ चे ६ वा. ते ७ वाजता दरम्यान आगामी गुढीपाडवा, रमजाम ईद, रामनवमी, हनुमान जयंती तसेच व्ही. व्ही.आय.पी यांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यस्थेच्या अनुशंगाने चांगापुर हनुमान मंदिर, अमरावती येथे पोलीस आयुक्त अमरावती शहर यांच्या आदेशाने दहशतवाद विरोधी मॉकड्रील जलद प्रतिसाद पथकाद्वारे आयोजीत करण्यात आली होती.

सदर मॉकड्रील दरम्यान दोन शस्त्रधारी इसमांनी मंदिर परिसरात गोळीबार करूण दोन भाविकांना ओलीस ठेवले होते. या मिळालेल्या माहीतीवर जलद प्रतिसाद पथकातील कंमांडो यांनी जलद प्रतिसाद पथकाचे पोउपनि अजय जाधव यांच्या निर्देशाने अत्यंत कुशलतेने आणि चपळाहीने कार्यवाही करूण कोणतीही मनुष्यहाणी होवु न देता १ अतिरेकी ताब्यात घेतले व १ अतिरेक्यास जागीच ठार केले व त्यांनी ओलीस ठेवलेल्या दोन भावीकांची सुखरूप सुटका केली.



वी.डी.डी.एस. पोनि. या कार्यवाहीत जलद प्रतिसाद पथकाचे अधिकारी व कमांडो, डॉग स्कॉड सोनाली गुल्हाने मॅडम, पोउपनि नरवने व स्टॉप, एटीवी चे पोनि दाताळकर मॅडम व स्टॉप, गाडगेनगर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोनि. गोरखनाथ जाधव सर व पोलीस स्टॉप, आर.सि.पी पथक आणि चांगापुर संस्थानचे व्यवस्थापक श्यामलाल लढढा, दिपक शर्मा, श्यामजी शर्मा, जयंत पांडे आणि त्यांचा स्टॉप यांनी सहभाग घेतला आणि संयुक्तपणे आपसात समन्वय साधुन मॉकड्रील यशस्वीरित्या पार पाडली.

सदरची दहशतवाद विरोधी मॉकड्रील मा. पोलीस आयुक्त साहेब श्री राकेश ओला सर यांच्या मार्गदशनाखाली आणि मा, पोलीस उपआयुक्त परिमंडळ क. २ श्याम घुगे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ क.१ गणेश शिंदे, पोलीस उपआयुक्त मुख्यालय रमेश धुमाळ सर तसेच सहायक पोलीस आयुक्त गाडगेनगर शिवाजी बचाटे सर यांच्या निर्देशनानुसार यशस्वीरित्या पुर्ण करण्यात आली.

## बहुजन समाजाचे कैवारी कांशीराम यांची ९२ वी जयंती हर्षोल्हासात साजरी

प्रतिनिधी १६ मार्च

**अमरावती :** आजाद समाज पार्टी (कांशीराम ) पक्षाच्या ६व्या वर्धापण दिनाच्या निमित्यावर १५ मार्च २०२६रोजी आजाद समाज पार्टी (कांशीराम ) चे संस्थापक अध्यक्ष :-नगीना खासदार ॲड, भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. मनिष भाऊ साठे यांच्या नेतृत्वात मा. उमेश गणेशराव दुर्योधन यांच्या सामाजिक आणि जनसामान्य जनतेच्या मदतीला धावून येण्याच्या ऋतिला व जनसामान्य लोकांच्या न्यायिक हक्का च्या प्रश्नावर आवाज उचलण्याच्या कार्याला पाहता



त्यांची अमरावती जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे... ही नियुक्ती खासदार भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार मनिष साठे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ) यांच्या उपस्थिती मध्ये त्यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे करण्यात आली. ही नियुक्ती आजाद समाज पार्टी च्या संघटनात्मक दृष्या मजबूती प्रधान करणारी ठरणार असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांनी दर्शवीला आहे नियुक्ती दरम्यान आजाद समाज पार्टी चे सर्व पदधिकारी उपस्थिती होते.. या प्रसंगी युवा शहराध्यक्ष नितीन रामभाऊ काळे आझाद समाज पार्टी याची उपस्थिती होती अशी माहिती सिद्धार्थ दामोधरे शहर मीडिया प्रभारी आझाद समाज पार्टी अमरावती यांनी दिली.

## जनगणनेसाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षणाला सुरूवात

### ◆ जनगणनेचे काम गांभीर्यपूर्वक करावे – जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती:** संपूर्ण देशात जनगणनेला सुरवात करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक मनुष्यबळाला प्रशिक्षण देण्यात येत आहे. देशाचे खरे चित्र या जनगणनेतून समोर येणार असल्याने यात सहभागी सर्वांनी जनगणनेचे काम गांभीर्यपूर्वक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जनगणना २०२७च्या अनुषंगाने आजपासून नियोजन भवनात तीन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात येत आहे. या प्रशिक्षण वर्गाचे आज उद्घाटन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, महापालिका उपायुक्त योगेश पिठे, सहआयुक्त विकास खंडारे, जिल्हा सूचना अधिकारी मनिषकुमार, तसेच मार्गदर्शक म्हणून जनगणना संचालनालाचे सहायक व्यवस्थापक प्रविण भगत, ऋषीकेश पाथरे उपस्थित होते.



जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, भारतातील जनगणनेला समृद्ध वारसा आहे. या जनगणनेमधून आलेल्या निष्कर्षावर निती आयोग काम करीत असते. यातून येणाऱ्या बाबींतून देशाचे प्रतिबिंब उमटत असते. जनगणनेला आकडेवारीचा आधार असल्याने ती तथ्यांवर खरी उतरणारी असते. यावेळी पहिल्यांदाच ॲपवर ही जनगणना होणार आहे. त्यामुळे बदलांची नोंद घेऊन कार्य करावे लागणार आहे. ही जनगणना कायद्याच्या आधारे होत असल्याने काम करणे बंधनकारक असून नागरिकांना माहिती द्यावी लागणार आहे. यावेळी जातनिहाय जनगणना होणार असून यात काळजीपूर्वक नोंदी घ्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले. श्रीमती शर्मा यांनी यावर्षीची जनगणना ही १६ वर्षानंतर होत आहे. यातून निर्माण होणारा डाटा हा देशाच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. जनगणनेच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील घरभेटीचे नियोजन करण्यात आले आहे, त्यामुळे जनगणनेच्या कामात अडचण निर्माण होणार नसल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी जणगणना कक्षाच्या राधिका देशमुख आणि भावना जिचकार यांनी सहकार्य केले. निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी सूत्रसंचालन केले. महापालिकेचे सहायक आयुक्त भूषण पुसदकर यांनी आभार मानले.

## ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी आगाऊ बुकींग करू नये

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती :** जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. मध्यतंरीच्या काळात फोनद्वारे होणाऱ्या बुकींगसाठी वेळ लागत असल्याने ग्राहकांमध्ये घबराहट निर्माण झाली. परिणामी ग्राहकांनी आवश्यकता नसताना खबरदारी म्हणून गॅस बुकींग सुरू केले. यामुळे वितरणावर परिणाम होत असल्याने ग्राहकांनी गॅस सिलिंडरसाठी आगाऊ बुकींग करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणाबद्दल वितरकांची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांच्यासह शहरातील गॅस वितरक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी वितरकांकडून सद्यस्थितीची माहिती घेतली. वितरकांनी ग्राहकांसाठी ॲप, तसचे फोनद्वारे बुकींगची सुविधा आहे. मात्र फोनद्वारे गॅस बुकींग करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या यंत्रणेमध्ये दुरूस्ती सुरू आहे. परिणामी ग्राहकांना बुकींग करताना वेळ लागत आहे. तसेच मध्यपूर्व भागातील युद्धामुळे घबराटीचे वातावरण असल्यामुळे ग्राहक आगाऊ गॅस बुकींग करीत आहे. बुकींग जादा झाल्यामुळे वितरणाला वेळ लागत आहे.

## महानगरपालिका करारनाम्यातील अटींचे उल्लंघन केल्याबद्दल मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला ९.६५ लाखांचा दंड

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेमार्फत शहरातील घनकचरा संकलन व वाहतूक (Coection<& Transportation of Municipaled Solid Waste) तसेच शहरातील दैनंदिन साफसफाईची कामे करण्यासाठी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यासोबत दिनांक २८/११/२०२५ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यानुसार कंत्राटदारामार्फत Part-A अंतर्गत कामे दिनांक ०१/१२/२०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहेत. करारनाम्यात नमूद अटी व शर्तींचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक असून स्वच्छता विभागामार्फत वेळोवेळी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान दिनांक ०१/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या कालावधीत काही त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

पाहणीदरम्यान कंत्राटदारामार्फत वापरात असलेल्या काही वाहनांकडे Driving Licenes, Registration Certificate, Insurance व Road Fitnes Certificate यांसारखी आवश्यक कागदपत्रे तपासणीवेळी उपलब्ध आढळून आली नाहीत. तसेच सदर कागदपत्रे स्वच्छता विभाग कार्यालयात सादर करण्यात आलेली नसल्याचेही आढळून आले आहे. करारनाम्यानुसार ही बाब बंधनकारक असून सदर त्रुटी ही करारनाम्यातील अटींचे उल्लंघन असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच करारनाम्यानुसार कंत्राटदाराने आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या सर्व कामगारांना Uniformed, Shoes, Caped, hand Gloves, PPE Kit तसेच ओळखपत्र (ID Card) उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना प्रत्यक्ष पाहणीदरम्यान अनेक कामगारांकडे वरील सुरक्षा साहित्य उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे.

घनकचरा व्यवस्थापनासारख्या आरोग्यदृष्ट्या संवेदनशील कामामध्ये कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असून यामध्ये झालेली त्रुटी गंभीर स्वरूपाची आहे.

## अमरावती महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांत 'HPV' लसीकरण मोहिमेचा एल्गार

प्रतिनिधी १७मार्च

**अमरावती :** १६ मार्च २०२६ राष्ट्रीय लसीकरण दिनाचे औचित्य साधून अमरावती महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने शहरात एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला (Cervical Cancer) रोखण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या एकूण १३ शहरी आरोग्य केंद्रांमध्ये व्यापक प्ज्न् लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आज शहरी आरोग्य केंद्र, हमालपुरा येथे या विशेष लसीकरण सत्राचे



यशस्वी आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या नगरसेविका . राधाताई कुरिल आणि नूतनताई भुजाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी मार्गदर्शन करताना राधाताई कुरिल म्हणाल्या की, मुलींचे आरोग्य हेच खऱ्या अर्थाने घराचे आरोग्य असते. भविष्यातील गंभीर आजारांपासून आपल्या लेकींना सुरक्षित ठेवण्यासाठी 'प्ज्न' लस हे एक प्रभावी सुरक्षा कवच आहे. पालकांनी जागरूक राहून आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे. तर मा. सौ. नूतनताई भुजाडे यांनी नमूद केले की, ठकर्करोगासारख्या आजाराला प्रतिबंध घालणे आता विज्ञानामुळे शक्य झाले आहे.



## टेकडीवर 'प्लास्टिक हटवा, पर्यावरण वाचवा' स्वच्छता मोहीम

प्रतिनिधी १७ मार्च

**खामगाव :** शहरातील जे. व्ही. मेहता नवयुग विद्यालय मागील टेकडीवर आज सकाळी नव संकल्प फाउंडेशनच्या वतीने 'प्लास्टिक हटवा पर्यावरण वाचवा' स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या टेकडीवर सकाळी व सायंकाळी अनेक युवक-युवती रनिंग व व्यायामासाठी येत असतात. तसेच जेष्ठ नागरिक व महिला ताजी व स्वच्छ हवा घेण्यासाठी येथे फिरायला येतात. मात्र या परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचल्यामुळे पर्यावरण व आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे आज स्वयंसेवकांनी टेकडीवरील प्लास्टिक पिशव्या व इतर कचरा गोळा करून परिसराची स्वच्छता केली.

स्वच्छता करताना काही धक्कादायक बाबी समोर आल्या. ज्या ठिकाणी नागरिक व मुले फिरायला येतात त्या ठिकाणी दारूच्या काचेच्या बाटल्या, प्लास्टिकच्या बाटल्या तसेच सिगारेटची पाकिटे मोठ्या प्रमाणात आढळून आली. त्यामुळे या परिसरात रात्रीच्या वेळी काही गैरप्रकार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिकांशी संवाद साधला असता त्यांनी सांगितले की रात्रीच्या वेळी काही तरुण या ठिकाणी येऊन पार्टी करतात, दारू पितात व गोंधळ घालतात. अंधार असल्यामुळे अशा घटना घडत असल्याचे नागरिकांनी सांगितले. या संदर्भात नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी देखील केल्या, मात्र अद्याप कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही. काही नागरिकांनी संबंधित तरुणांना समज देण्याचा प्रयत्न केला असता ते उलट नागरिकांच्या अंगावर धावून येऊन शिवीगाळ करतात, अशी माहितीही नागरिकांनी दिली.

या टेकडी परिसराच्या आजूबाजूला सुशिक्षित नागरिकांचे वास्तव्य आहे. अनेकांच्या घरात मुली असून रात्रीच्या वेळी काही युवक दारू पिऊन फिरत असल्याने परिसरातील सुरक्षिततेबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, असेही नागरिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर नव संकल्प फाउंडेशनच्या वतीने नगर परिषद प्रशासनाने येथे लाईट व्यवस्था करावी, सूचना फलक (फ्लेक्स) लावावेत तसेच पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. अनेक वेळा पोलीस गाडी आली की संबंधित तरुण पळून जात असल्याने कॉम्बिंग ऑपरेशन करून दोषींवर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या टेकडीच्या समोरच ग्रामीण पोलीस स्टेशन व डीवायएसपी कार्यालय असून मागील बाजूस शाळा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या मोहिमेचे नेतृत्व सलोनी गव्हाळ व भावेश पवार यांनी केले. या उपक्रमात वैष्णवी गोलाईत, सृष्टी श्रीवास्तव, प्रगती गव्हाळ, विक्की जाधव, रुद्राक्ष सोळंके, गौरव भालेराव, सुरज जाधव, आनंद लोखंडे व बंटी गव्हांदे यांनी सहभाग नोंदवला.

स्वच्छता मोहिमेदरम्यान जमा करण्यात आलेला प्लॅस्टिक व इतर कचरा उचलण्यासाठी नगर परिषदेकडून घंटा गाडी उपलब्ध करून देण्यात आली, त्याबद्दल नव संकल्प फाउंडेशनच्या वतीने नगर परिषद प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

## युगधर्म पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी समर कॅम्पचे आयोजन

प्रतिनिधी १७ मार्च

**खामगाव :** खामगाव शहरातील युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये समर कॅम्पचे आयोजन १६ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत करण्यात आले आहे. सकाळी ९ ते १२ या वेळेत होणाऱ्या या कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

या समर कॅम्पमध्ये चित्रकला, झुंबा, स्पोकन इंग्लिश, योगा, डान्स व फनी डान्स, हँडरायटिंग सराव, फन गेम्स, गुड मॅनर्स ॲक्टिव्हिटी, क्लीननेस ॲक्टिव्हिटी, हेल्दी हॅबिट्स, व्हॅल्यू एज्युकेशन तसेच कम्प्युटरशी संबंधित उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी वॉटर पुल , ॲक्टिव्हिटीसारखे मनोरंजक उपक्रमही ठेवण्यात आले आहेत.

हा कॅम्प वय वर्ष तीन ते दहा वर्षापर्यंत विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. खामगावातील मुले यामध्ये भाग घेऊ शकतात तीन ते दहा वर्ष वयोगटातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. संपूर्ण कॅम्पसाठी पाचशे रुपये फी ठेवण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बस सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. उन्हाळी सुट्टीत विद्यार्थ्यांनी या समर कॅम्पमध्ये सहभागी होऊन विविध कौशल्ये विकसित करण्याची संधी घ्यावी, असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

## गाडगेनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम

### ◆ एका आस्थापनेला ५ हजारांचा दंड

प्रतिनिधी १७ मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरात स्वच्छता व प्लास्टिक बंदी नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी सातत्याने मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून दिनांक १६ मार्च २०२६ रोजी झोन क्र.१ रामपुरी कॅम्प अंतर्गत येणाऱ्या गाडगेनगर परिसरात प्लास्टिक जप्ती व डस्टबिन तपासणी मोहीम राबविण्यात आली. ही कारवाई महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव आणि सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मोहिमेदरम्यान एकूण ९ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही आस्थापनांमध्ये कापडी व कागदी



पिशव्या तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरल्या जात असल्याचे आढळून आले. मात्र एका आस्थापनात प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने संबंधित आस्थापना चालक सचिन पालेकर यांच्याकडून ५,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक राजू डीक्याव, प्लास्टिक स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी तसेच स्वास्थ निरीक्षक निखिल खंगाळे, प्रवीण उसरे आणि रोहित हडाले उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्ह्यात १४ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ

**अकोला:** जिल्ह्यातील १४ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ देण्यात आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील लोणसणा, बपोरी, बाळापूर तालुक्यातील काजीखेड-२ ( हिंगणा शिकारी), मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ, तेल्हारा तालुक्यातील वांगरगाव आदी ७ वाळूघाटांना तेरावी मुदतवाढ देण्यात आली आहे.

अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, उगवा, तसेच बाळापूर तालुक्यातील बहादूरा, सागद, नागद, मांजरी या ७ वाळूघाटांच्या ई-लिलावाला पंधरावी मुदतवाढ देण्यात आली आहे. या वाळूघाटांच्या ऑनलाईन ई-निविदा दि. २३ मार्चला दु. १२ वा. पर्यंत स्वीकारण्यात येतील. तांत्रिक लिफाफा व त्यानंतर आर्थिक लिफाफा दि. २४ मार्चला उघडण्यात येईल. ई-लिलाव प्रक्रिया दि. २५ मार्चला सकाळी १० ते दु. १ वा. दरम्यान होईल, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे यांनी दिली.

## बीज परीक्षण प्रयोगशाळेतर्फे कालबाह्य बियाण्यांचा लिलाव

**अकोला:** येथील बीज परीक्षण प्रयोगशाळेतर्फे तपासणीअंती कालबाह्य झालेल्या ३० क्विंटल सोयाबीन बियाण्याचा लिलाव जाहीर करण्यात आला आहे. पशुखाद्य उत्पादक संस्था तथा पशुपालकांनी लिलावात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लिलाव दि. २४ मार्च रोजी दु. १२ वा. बीज परीक्षण प्रयोगशाळा परिसर, नीळकंठ सूतगिरणीसमोर, शिवणी, अकोला येथे होईल. लिलावापूर्वी प्रयोगशाळेत बियाण्याची प्रतवारी कार्यालयीन वेळेत पाहता येईल. लिलावाच्या अटी व शर्ती प्रयोगशाळेच्या सूचनाफलकावर पहावयास मिळतील.

## सदगुरूच्या कृपेने दिव्य ज्ञानाची प्राप्ती-डॉ वसुधा देव

**अकोला:** सदगुरु हे भक्तामध्ये आत्मिक शांती व आनंद निर्माण करतात. सद्गुरूच्या कृपेच्या दिव्य प्रकाशाने जीवनातील अज्ञानाचा काळोख दूर होऊन ज्ञानाच्या प्रकाशाची निर्मिती होत असते. म्हणून शाश्वत आनंदाच्या प्राप्तीसाठी सदगुरूची कृपा जीवनात आवश्यक असल्याचा हितोपदेश माजी प्राचार्य डॉ सौ वसुधा विनोद देव यांनी केला.रामदासपेठ परिसरातील श्रीनाथ दत्त मंदिरात सोमवार पासून सुरू झालेल्या पु माधवनाथ महाराज जन्मोत्सव सोहळ्यात डॉ सौ देव या माधवनाथ महाराज यांचे तत्त्व विचार यावर प्रवचन देत होत्या.आपल्या प्रथम पुष्पात त्यांनी पूज्य माधवनाथ महाराज यांच्या लोकनाथ सूत यांनी लिहिलेल्या दीपप्रकाश ग्रंथाचे सुंदर विवेचन केले.

## कुंभारी येथे प्रमोद मुरुमकार यांचा सत्कार

**अकोला :** युरोप विदेश शेतकरी अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण करून मायदेशी परतलेल्या महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार यांचा फार्म लॅब, कुंभारी यांच्या वतीने १४ मार्च २०२६ रोजी सत्कार करण्यात आला. शिवणी कृषी मंडळाचे अधिकारी समाधान गाडेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी सहाय्यक सदार, फार्म लॅब कुंभारीचे संचालक गणेश ठोंबरे तसेच शुभम बिडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

# रामनवमी ते हनुमान जयंती उत्सव दरम्यान श्रीमद् भागवत कथा सप्ताह

प्रतिनिधी १७ मार्च



**मूर्तिजापूर:** महंत १००८ सीताराम बाबा यांच्या कृपेने तालुक्यातील बोर्टा येथील श्री हनुमान मंदिर देवस्थान येथे २६ मार्च पासून श्रीमद भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथा वक्ते विठ्ठल महाराज धोतर्डीकर, राजर्षी शाहू महाराज जेष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना निवड समिती सदस्य अकोला जिल्हा आहेत.

दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ६ ते ७ काकडा आरती समस्त टाळकरी मंडळ, बोर्टा, सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ भागवत कथा वाचन सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८:३० ते १०:३० हरिकिर्तन होईल तर



ह.भ.प. विठ्ठल महाराज धोतर्डीकर यांचे दररोज तसेच काल्याचे कीर्तन गुरुवार २/०४/२०२६ रोजी होईल. गुरुवार २६ मार्च रोजी बाल कीर्तनकार कृष्णालीताई गावंडे यांचे कीर्तन, शुक्रवार २७ रोजी संजय महाराज नाचोणे वासनी बु., २८ रोजी ह.भ.प. वैष्णवीताई संतोष लवटे कान्हेरी गवळी, अकोला, २९ रोजी ह.भ.प. अभिषेक महाराज खोडके आळंदी (देवाची), ३० रोजी ह.भ.प. सोमनाथ महाराज बनकर अंभई, संभाजीनगर तर ३१ मार्चला ह.भ.प. सोहम महाराज काकडे यांचे कीर्तन होईल. बुधवार १/०४/२०२६ श्रीराम चरीत मानस सुंदरकांड मंडळ, बोर्टा. ऑर्गन वादक व गायक ओम महाराज भोजने, चांदुर बाजार नवला व मृदंग वादक रघुनंदन महाराज भलात्रे, आळंदी, अ?क्टोपॅड वादक यश महाराज भोजने. गायनाचार्य अनुप महाराज देशमुख, संदीप महाराज उघडे, अरविंद महाराज माळी, झाडेगांव राहतील. सायंकाळी ४:३० वाजता गावामधून ग्रंथ पुजन व भव्य पालखी सोहळा व मिरवणूक काढण्यात येईल. गुरुवार २ एप्रिल रोजी दुपारी १२:३० वा. महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. सप्ताहातील अन्नदाते उमेश हरिचंद्र गवळी, मंगेश ओंकारराव होनकर, गजाननराव नेमाडे, मनोज यशवंतराव तांबडे, संतोष तुळशीराम उघडे, गणेशराव लक्ष्मणराव जोगळे, तुकारामजी आ. कळसकर, ज्ञानेश्वरराव पांडुरंगजी तांबडे, मोहन रामेश्वरराव वानखडे, संतोष पुंडलीकराव वानखडे, धीरज देविदास तांबडे, आकाश गजानन उघडे, राजकुमार भिमरावजी उघडे, मनीष श्रीधर उघडे आहेत. जयंती उत्सवाचे आयोजक हनुमान मंदिर, विश्वस्त मंडळ व समस्त गावकरी मंडळ, बोर्टा ता. मुर्तिजापूर हे आहेत. भाविकांनी विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रामदासपेठेत शनिवारी विशाल हिंदू संमेलन

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला:** हिंदू जागरणाच्या दिशेला नवी ऊर्जा व चेतना प्रदान करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने सनातन संस्कृती, सनातन धर्म व सामाजिक एकतेचे प्रतीक असलेल्या विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास आपल्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढेल तसेच समाजात नव्या ऊर्जेचा संचार होईल. शनिवार, २१ मार्च रोजी सायंकाळी ६ वा. रामदासपेठेतील नानासाहेब उजवणे यांच्या निवासस्थान समोरच्या प्रांगणात संमेलन होत आहे.

ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाघ प्रमुख वक्ते आहेत. तसेच प्रा. डॉ. सुभाष लोहे संयोजक-संत अध्ययन समूह महाराष्ट्र, प्रा. सौ. वैशालीताई फडणीस विभाग सहकार्यवाहिका रा.से. समिती अतिथी आहेत. संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल हिंदू समाजाने केले आहे.

# 'जगा आणि जगू द्या' हा विचार स्वीकारावा : गुलाबराव गावंडे

प्रतिनिधी १७ मार्च

**मुर्तिजापूर :** दोन समाजांना एकमेकांविरुद्ध उभे करून शेवटी काय मिळणार? काहीच नाही. काही लोक राजकारणासाठी वाद निर्माण करतात आणि स्वतः मात्र आरामात राहतात. त्यामुळे अशा गोष्टींकडे लक्ष न देता 'जगा आणि जगू द्या' हा विचार स्वीकारावा, असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांनी केले.

शहरात कौमी हिंदू-मुस्लिम एकतेच्या वतीने आयोजित इफ्तार पार्टीत ते बोलत होते. सामाजिक कार्यकर्ते पप्पू तिडके व मित्रपरिवार यांच्या पुढाकाराने हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी या इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.



गुलाबराव गावंडे म्हणाले, हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मानवतेचा संदेश दिला. नमाज आणि प्रार्थनेमुळे जीवनात शांती व समाधान प्राप्त होते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सर्व मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.

इफ्तारला काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, मौलाना जफर खतीब, शिवसेना शहरप्रमुख विनायक गुल्हाने, जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी, नगरसेवक इब्राहिम घाणीवाला, नगरसेवक सचिन देशमुख, निजाम इंजिनिअर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत तिवारी, पप्पू तिडके, नगरसेवक निजाम ललकार, नगरसेवक तसवर खान, नगरसेवक गंपू शर्मा, सद्दाम पटेल, रवि माडकर, माजी प्राचार्य सत्यनारायण तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

जमाते इस्लामीच्या वतीने गुलाबराव गावंडे व अशोक अमानकर यांना कुरआन भेट देण्यात आला. तसेच स्वच्छता अभियानाच्या निमित्ताने मौलाना जफर खतीब व समाजसेवक पप्पू तिडके यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पत्रकार अन्वर खान यांनी केले. यावेळी वरिष्ठ पत्रकार दिलीप देशमुख, दीपक अग्रवाल, प्राध्यापक दीपक जोशी, सैयद जुनैद, मोहम्मद शारिक, बालासाहेब खांडेकर, संदीप जळमकर, संजय गुप्ता, प्रणव फुलझडे, बब्बा खान, आरिफ ठेकेदार, मंसूर रही, युनूस खान, जुनैद खतीब, इरफान इंजिनियर. गुलाबराव म्हसाये, सुरेश जोगळे, निसार अहमद, शेख रफीक, मोहम्मद तंजीम, आसिफ खान, राम पाटील हिंगणकर डॉ. फुलझले, सै राजीम, शेख शहबाज, बबली मो इमरान जितु चौबे दिनेश श्रीवास आदींसह मोठ्या संख्येने हिंदू-मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# मूर्तिजापूरात 'शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर

प्रतिनिधी १७ मार्च

**मूर्तिजापूर :** शहरातील पुंडलिक महाराज संस्थान येथे प्रशासनाच्या वतीने 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' तसेच जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली तसेच त्यांच्या अडचणी व समस्यांवर तत्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान महसूल, आरोग्य, पंचायत, नगर परिषद, भूमी अभिलेख, पोलीस विभाग यांसह विविध विभागांचे १४ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्सवरून नागरिकांना शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच



विविध दाखले आणि प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.

कार्यक्रमाला आ. हरीश पिंपळे, नगराध्यक्ष हर्षल साबळे, अप्पर आयुक्त वाघमारे, जिल्हाध्यक्ष भूमी अभिलेख भारती खंडेलवाल, उपविभागीय अधिकारी संदीप अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, मुख्याधिकारी निलेश जाधव, मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव, ग्रामीणचे ठाणेदार श्रीधर गुट्टे, मानाचे ठाणेदार गणेश नावकार, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर कराळे, गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आमदार हरीश पिंपळे यांनी कौतुक केले. तसेच शिवाजी महाराज महसूल शिबिर निमित्त नागरिकांच्या समस्या निकाली काढण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

# वीरशैव लिंगायत समाजाचा उपवधू-वर परिचय मेळावा

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** वीरशैव लिंगायत समाज सर्व शाखीय उपवधू-वर परिचय मेळावा रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी जिल्हा परिषद कर्मचारी भवन, आकाशवाणी समोर, सिव्हिल लाईन चौक, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे. सर्व शाखीय वीरशैव लिंगायत समाजबांधवाच्या आग्रहानुसार, रविवार, दि. २२ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते सायं ५ वाजे पर्यंत उप-वर वधू परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. अकोला येथील यापूर्वीच्या मेळाव्याला सुद्धा सर्व समाजबांधवांनी भरभरून प्रतिसाद, आशीर्वाद व सहकार्य दिल्यामुळे यशस्वीरित्या संपन्न झाले. त्याचीच प्रेरणा घेऊन पुनश्च भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



वीरशैव लिंगायत समाज विखुरलेला असून, त्याला एकत्र आणणे, समाजबांधवांचा परिचय होणे, पालक परिचय होणे, उपवधू-उपवर यांना परिचयासाठी प्रोत्साहित करणे तसेच सदर समिती मार्फत सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणे, हे होय. यावेळी अध्यक्ष राजू मिसे, उपाध्यक्ष मुकुंद भुकन, अतुल बिडवे, रविंद्र कारंजकर, गजेंद्र चिल्लूरे, संतोष पस्तापूरे, अविनाश मीटकरी, राजेश हेगू तसेच महिला समिती अर्चना मिटकरी, भारती डेहनकर, सौ.चिल्लूरे, सौ. बिडवे, सौ. भुरे, सौ. भुकन, सौ. दलाल, सौ. मिटकरी अशी माहिती मुकुंद भुकन यांनी दिली आहे. दरवर्षी मेळावा हा मार्च मध्ये घेतल्या जातो महाराष्ट्रातील लिंगायत समाज बांधवांचा सहभाग असतो.

# अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी पोलीस-आर्मी भरतीचे विशेष प्रशिक्षण

## ◆ अकोल्यात ६५ विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला:** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI), पुणे यांच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी विविध प्रशिक्षण उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस व आर्मी भरतीसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांना शासकीय सेवेत संधी मिळावी हा मुख्य उद्देश आहे.

याच पार्श्वभूमीवर अकोला येथे प्रा. संतोष कुटे क्लासेसद्वारे संचालित श्रीमती द्वारकाबाई रामराव कुटे बौद्धेशीय संस्था यांच्या अंतर्गत सदर प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत असून पोलीस व आर्मी भरतीसाठी आवश्यक असलेले लेखी तसेच मैदानी प्रशिक्षण एकाच ठिकाणी उपलब्ध झाले आहे.

या प्रशिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTIed), पुणे यांच्या माध्यमातून निवड प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार अकोला केंद्रासाठी एकूण ६५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दिनांक १६ मार्च २०२६ पासून नियमित प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना दररोज चार तास लेखी परीक्षेसाठी मार्गदर्शन दिले जाते. पोलीस व आर्मी भरतीसाठी आवश्यक असलेल्या विषयांमध्ये सामान्य ज्ञान, गणित, बुद्धिमत्ता चाचणी, चालू घडामोडी, इतिहास, भूगोल आणि संविधान या विषयांचा समावेश असतो. अनुभवी प्राध्यापक आणि मार्गदर्शकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने आणि स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास शिकविला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचे योग्य नियोजन करता येते आणि परीक्षेची तयारी प्रभावीपणे करता येते.ष्लेखी मार्गदर्शनाबरोबरच संध्याकाळी मैदानी परीक्षेचे प्रशिक्षण देखील दिले जाते. पोलीस व आर्मी भरतीमध्ये शारीरिक क्षमता अत्यंत महत्त्वाची असल्याने विद्यार्थ्यांना धावणे, लांब उडी, गोळाफेक, पुश-अप्स, सहनशक्ती वाढविणारे व्यायाम अशा विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या देखरेखीखाली विद्यार्थ्यांचा सराव घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता वाढण्यास मदत होते आणि ते आत्मविश्वासाने भरती प्रक्रियेला सामोरे जाऊ शकतात.

या प्रशिक्षण कार्यक्रमाची आणखी एक विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांना दिवसभर अभ्यासिकेचे वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे घरी अभ्यासासाठी योग्य वातावरण नसते. अशा विद्यार्थ्यांसाठी शांत आणि अभ्यासास पोषक वातावरणात अभ्यास करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थी दिवसभर अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतात. या उपक्रमामागील मुख्य उद्देश म्हणजे अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत अधिकाधिक संधी मिळवून देणे हा आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असूनही त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे ते स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडतात. मात्र अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते आणि त्यांचे करिअर घडण्यास मदत होते. या संदर्भात प्रा. संतोष कुटे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासाचे मार्गदर्शन देणे हा उद्देश नसून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि त्यांना शिस्तबद्ध जीवनशैलीची सवय लावणे देखील महत्त्वाचे आहे.

# नगर परिषद पथकाची धडक कारवाई

प्रतिनिधी १७ मार्च

**मूर्तिजापूर:** नगरपरिषद हद्दीमध्ये स्वच्छता राखणे, पर्यावरण संरक्षण करणे व शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. तथापि, काही नागरिक/व्यावसायिकांकडून कचरा उघड्यावर टाकणे, परवानगीशिवाय फ्लेक्स / होडिंग लावणे तसेच शासनाने प्रतिबंधित केलेल्या प्लास्टिक पिशव्या व साहित्याचा साठवणूक वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, घनकचरा व्यवस्थापन नियम, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम अंमलबजावणीसाठी दंडात्मक कारवाई करणे साठी विशेष पथक गठीत करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणी नियमांचे पालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मुर्तीजापुर नगर परिषदेच्या दंडात्मक कारवाई



पथकाने शहरात विशेष मोहीम राबवून विविध ठिकाणी धडक कारवाई केली. नगर परिषदेच्या पथकाने शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर, प्रमुख रस्ते तसेच गर्दीच्या भागात पाहणी करून नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कारवाई केली. या मोहिमेदरम्यान सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, रस्त्यावर अनधिकृत अतिक्रमण करणे, दुकानासमोर साहित्य ठेवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, परवानगीशिवाय फ्लेक्स/होर्डिंग लावणे तसेच स्वच्छता नियमांचे पालन न करणाऱ्या नागरिक व व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच संबंधितांना पुढील काळात नगर परिषद नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहरातील स्वच्छता व शिस्त अबाधित राखण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, अतिक्रमण करू नये तसेच नगर परिषद नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही निलेश जाधव मुख्याधिकारी नगर परिषद मुर्तीजापुर यांच्या मार्गदर्शनात झाली असून, नगर परिषद दंडात्मक पथकाचे कर्मचारी प्रसाद राठोड नगर अभियंता, आशिष भगत संगणक अभियंता, विजय लकडे स्वच्छता निरीक्षक, नरसिंग चावरे स्वच्छता निरीक्षक केतन चिंचमलातपुरे शहर समन्वयक, चित्रा हनुमंते लिपिक, शारदा कानोसे लिपिक, यश यावले शिपाई सहभागी झाले होते.

# गोमांस वाहतूक प्रकरणात पातूर पोलिसांवर प्रश्नचिन्ह

## ◆ १२ ते १३ क्विंटल गोमांस जप्ती असूनही कारवाई नाही

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला:** पातूर येथे गोमांस वाहतूक प्रकरणात गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. मोठ्या प्रमाणात गोमांस घेऊन जाणाऱ्या वाहनाची माहिती पोलिसांना २४ तास आधी मिळूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

परिसरात गोमांस वाहतूक प्रकरणामुळे वातावरण तापले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका वाहनामध्ये तब्बल १२ ते १३ क्विंटल गोमांस वाहतूक केली जात होती. या घटनेची माहिती पातूर पोलिसांना तब्बल २४ तास आधी मिळाली होती.

मात्र, एवढी गंभीर माहिती मिळूनही पोलिसांनी तत्काळ कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, पोलीस घटनास्थळी आधीच दाखल झाले होते, तरीही वाहनावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे अधिकच संशयास्पद ठरत आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात गोमांस सापडूनही कारवाई का करण्यात आली नाही? यामागे नेमके कारण काय? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच, पोलीस प्रशासनाने या संदर्भात स्पष्ट भूमिका मांडावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# प्रा. राजेश ताले यांना राज्यस्तरीय पुस्तकमित्र पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोट:** वीर भगतसिंग युथ फोरम, मुंबई द्वारा दिला जाणारा यावर्षीचा मानाचा राज्यस्तरीय पुस्तकमित्र पुरस्कार २०२६ स्वामी विवेकानंद ग्रुप ऑर्गनायजेशन चे अध्यक्ष,राष्ट्रीय व्याख्याते प्रा.राजेश पाटिल ताले यांना जाहीर झाला राजेश ताले स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायजेशन च्या माध्यमातून गेल्या १२ वर्षांपासून गाव तिथं वाचनालय आणि शाळा तिथं ग्रंथालय या उपक्रमाअंतर्गत वाचनसंस्कृती चे संवर्धन आणि प्रचार-प्रसार चे कार्य करीत आहेत.पश्चिम विदर्भात वाचनालय चळवळीच्या क्षेत्रात स्वामी विवेकानंद ग्रुप प्रा.राजेश ताले यांच्या नेतृत्वात उल्लेखनीय कार्य करीत आहे.ग्रुपने गेल्या १२ वर्षात पश्चिम



विदर्भात जवळपास ११५ वाचनालय स्थापन केले, १ लाख च्यावर पुस्तके ग्रामीण भागातील विविध शाळांना आणि विद्यार्थ्यांना वितरित केली आहेत आणि विशेष म्हणजे अकोला जिल्ह्यातील माझोड हे गाव लोकसहभागातून पुस्तकांचे गाव बनविण्याचे कार्य सुरु आहे.वाचनध्यास या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण भागात विद्यार्थी आणि पालकांमध्ये वाचनाचे प्रमाण वाढ विण्याकरिता स्वामी विवेकानंद ग्रुप ची संशोधन आणि विकास समिती कार्य करीत आहे.यामुळे पश्चिम विदर्भात वाचनसंस्कृती दिवसेंदिवस वाढत आहे तसेच या उपक्रमामुळे ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना चांगले माध्यम उपलब्ध झाले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १७ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अनैतिक संबंधातून ‘आतिश’चा खेळ खल्लास

## पती-पत्नीने घडविले हत्याकांड

प्रतिनिधी १७ मार्च

**यवतमाळ :** लाडखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाघापूर शेतशिवारात आढळलेल्या तरुणाच्या निर्घृण हत्येचा उलगडा अवघ्या २४ तासांत करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. अनैतिक संबंधातून निर्माण झालेल्या वादातून पती-पत्नीने संगनमताने खून केल्याचे तपासात उघड झाले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मारेकरी असलेल्या पती-पत्नीला अटक केली आहे.

अंकुश नागोराव खोडे (वय ४३), त्यांची पत्नी रुपाली अंकुश खोडे (वय ३८, रा. दांडेकर लेआउट, यवतमाळ) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. तर आतिश सुभाषराव देशमुख (वय ३६, रा. गोविंदनगर, यवतमाळ) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे.

१५ मार्च रोजी सकाळी सुमारे आठच्या सुमारास वाघापूर शेतशिवार परिसरात ३० ते ३५ वयोगटातील एका पुरुषाचे प्रेत दगडाने ठेचून व चाकूने भोसकून ठार केल्याच्या अवस्थेत आढळून आले होते. आतिश देशमुख याचा मृतदेह असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी त्याचे काका पंजाबराव मारोतराव देशमुख यांनी लाडखेड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाची फिर्याद दिली होती.

त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन राठोड, पोलीस अंमलदार बबलू चव्हाण, मिथुन जाधव, सोहेल मिर्झा, किशोर झेंडेकर, पवन ढवळे, अमित झेंडेकर, कविश पाळेकर, दिगंबर पिलावन, महिला पोलीस शिपाई प्रेरणा कांबळे तसेच चालक अंमलदार जितू चौधरी व विवेक पेठे यांनी केली. पुढील तपास लाडखेड पोलीस करीत आहे.



### कॉल डिटेल तपासाचा धागा

■ या गुन्ह्याच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक तपास हाती घेत मृताच्या मोबाईल कॉल रेकॉर्डचे विश्लेषण केले. त्यातून अंकुश खोडे व रुपाली खोडे यांच्यावर संशय बळावला. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

### अनैतिक संबंधातून गेम

■ तपासात पुढे आलेल्या माहितीनुसार, मृतकाचे रुपाली हिच्याशी पूर्वीपासून अनैतिक संबंध होते. तो वारंवार त्रास देत असून तिच्या पतीला जिवे मारण्याच्या धमक्या देत होता. या त्रासाला कंटाळून १४ मार्च रोजी दोघांनी त्याला वाघापूर शेतशिवारात बोलावून घेतले आणि चाकूने वार करून तसेच दगडाने ठेचून त्याची हत्या केली.

# कनिष्ठ सहायक ७४ हजारांची लाच घेताना जेरबंद

प्रतिनिधी १७ मार्च

**यवतमाळ :** वाढीव पेन्शन मंजूर करून दिल्याच्या मोबदल्यात ७४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना दारव्हा पंचायत समितीतील कनिष्ठ सहायकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी सापळा रचून रंगेहात पकडले.

अफरोज खान कलीम खान पठाण (वय ४४), कनिष्ठ सहायक, आस्थापना विभाग, पंचायत समिती दारव्हा (वर्ग-३) असे आरोपी कर्मचाऱ्याचे नाव आहे. तक्रारदार (वय २१) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या ८७ वर्षीय आजीला ८० वर्षांनंतर मिळणारे वाढीव पेन्शन मंजूर करण्यात आले होते. त्यांच्या खात्यावर १ लाख ७३ हजार ८७६ रुपये जमा झाले होते. मात्र, आरोपी कर्मचाऱ्याने तक्रारदाराला पेन्शनची रक्कम ९५ हजार रुपये असून खात्यात जास्तीची रक्कम जमा झाल्याचे भासवले. ही रक्कम मंजूर करून दिल्याच्या मोबदल्यात सुरुवातीला ७५ हजार रुपयांची लाच मागितली, अशी तक्रार करण्यात आली. तक्रारीची पडताळणी १६ मार्च २०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आली. यावेळी आरोपीने तडजोडीअंती ७४ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. सापळा कारवाईदरम्यान आरोपीने तक्रारदाराकडून ७४ हजार रुपये स्वीकारून ती रक्कम आपल्या टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदाराच्या इशाऱ्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान आरोपीकडून विवो कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी दारव्हा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. पथकात पोलीस निरीक्षक मनोज ओरके, पोलीस हवालदार सुधीर कांबळे, अतुल मत्ते, रोहिणी पाटील, पोलीस नाईक सचिन भोयर, पोलीस शिपाई भागवत पाटील, आकाश सहारे, सुरज मेश्राम, सतीश सोनोने, महिला पोलीस शिपाई मनीषा राजुरकर तसेच चालक पोलीस हवालदार दिनेश सरोदे व पोलीस शिपाई अतुल नागमोते यांचा समावेश होता.

या कारवाईचे पर्यवेक्षण पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांनी केले असून मार्गदर्शन पोलीस अधीक्षक बापू बांगर व अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांनी केले. दरम्यान, कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने कामासाठी लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भूमिपूजनात प्रोटोकॉल भंगाचा आरोप; नगर परिषदेत ‘भाऊशाही’वर विरोधकांचा निशाणा

प्रतिनिधी १७ मार्च

**उमरखेड :** शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये आयोजित भूमिपूजन कार्यक्रमात प्रोटोकॉलचे पालन न करता प्रशासन व संबंधित नगरसेवकांना विश्वासात न घेता कार्यक्रम पार पाडण्यात आल्याचा आरोप करत विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. या प्रकरणी सोमवारी (दि. १६) स्थानिक विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी निषेध नोंदवला.

यावेळी भाजपचे गटनेते विजय हरडपकर, नगरसेविका ज्योत्सना प्रतिक रुडे, करुणा कुबडे, नगरसेवक सुरेंद्र कोडगिरवार, गोपाल कलाने, अमोल तिवरंगकर, भास्कर साधू, स्वीकृत नगरसेवक ॲड. विजय गुजरे, जिल्हा सरचिटणीस महेश काळेश्वरकर, डॉ. प्रतिक रुडे व पुंडलिक कुबडे उपस्थित होते.



विरोधकांनी सांगितले की, मागील तीन महिन्यांपासून नगरपरिषदेच्या मासिक सभांमध्ये विरोधी नगरसेवकांना विश्वासात न घेता केवळ बहुमताच्या जोरावर ठराव मंजूर केले जात आहेत. शहराच्या विकासाशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा न करता निर्णय घेतले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच नगरपरिषदेचा अर्थसंकल्प अद्याप सादर करण्यात आलेला नसल्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला.

शहरातील काही विकासकामांच्या भूमिपूजनावेळी प्रशासन, संबंधित प्रभागातील नगरसेवक तसेच आमदारांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोपही करण्यात आला. आमदार किसन वानखेडे व भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या निधीचे श्रेय सत्ताधारी घेत असल्याचा दावा विरोधकांनी केला.

याशिवाय पाणीपुरवठा, ड्रेनेज समस्या, अतिरिक्त कर आकारणी, घरकुल योजनेतील लाभार्थी निवड, भटक्या कुत्र्यांचा प्रश्न आणि शहरातील स्वच्छतेच्या समस्यांकडे नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही विरोधी नगरसेवकांनी केला.

### भाऊंचा आदेश आल्यावर काम

■ नगरपरिषदेत जनहिताची कामे मांडल्यास “भाऊंचा आदेश आल्यावरच काम होईल” असे कर्मचाऱ्यांकडून सांगितले जात असल्याचा आरोप विरोधकांनी पत्रकार परिषदेत केला.

### “नगराध्यक्षा नाममात्र ?”


■ नगराध्यक्षांच्या केबिनमध्ये दोन स्वीकृत नगरसेवक बैठका घेताना दिसत असून नगरपरिषदेची यंत्रणा त्यांच्या नियंत्रणाखाली चालत असल्याचा आरोपही विरोधी नगरसेवकांनी केला.

# दिव्यांग लाभार्थ्यांसाठी UDID कार्ड सक्तीचे

प्रतिनिधी १७ मार्च

**झरी जामणी :** संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या मासिक अर्थसहाय्यात शासनाने वाढ केली असून, या योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (UDID Card) सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी तातडीने UDID कार्ड सादर करावे, असे आवाहन तहसील प्रशासनाने केले आहे.

शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०२५ नुसार संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ




योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या मासिक अर्थसहाय्यात १५०० रुपयांवरून २५०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. ही वाढ ऑक्टोबर २०२५ पासून लागू करण्यात आली असून, शासनस्तरावर डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक किंवा पोस्ट खात्यात थेट रक्कम जमा केली जात आहे. दरम्यान, दिव्यांगांसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व सवलतींचा लाभ घेण्यासाठी राज्यातील सर्व दिव्यांगांसाठी UDID कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजनेतील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी UDID कार्ड सादर करणे आवश्यक आहे. ज्या लाभार्थ्यांकडे अद्याप ऑफलाईन दिव्यांग प्रमाणपत्र आहे, त्यांनी आठ दिवसांच्या आत UDID कार्ड काढून घ्यावे. तसेच ज्या दिव्यांग लाभार्थ्यांनी अद्याप UDID कार्ड सादर केलेले नाही, त्यांनी UDID कार्डची झेरॉक्स प्रत, आधार कार्डची झेरॉक्स प्रत आणि पोस्ट किंवा बँक पासबुकची झेरॉक्स प्रत तहसील कार्यालयातील संगायो विभाग, झरी जामणी येथे तात्काळ सादर करावी, असे आवाहन तहसीलदार अक्षय रासने यांनी केले आहे.

# थकीत करदात्यांविरोधात यवतमाळ न.प.करणार कठोर कारवाई

प्रतिनिधी १७ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषद हद्दीतील थकीत मालमत्ता कर वसुलीची विशेष मोहीम सुरू असून त्यासाठी झोननिहाय वसुली पथक सक्रिय आहेत. अभय योजनेनुसार थकीत मालमत्ता करावर आकारलेल्या शास्ती करात देण्यात आलेल्या विशेष सवलतीचा अनेक करदात्यांनी लाभ घेतला आहे. तथापि अद्यापही ज्यांनी थकीत व चालू कर भरलेला नाही अशा करदात्याविरुद्ध वसुलीची मोहीम राबविण्यात येत आहे.

जुन्या यवतमाळ शहरासह न. प. हद्दीतील लोहारा, वाघापूर, पिंपळगाव, मोहा, भोसा, डोरली डोळंबा, उमरसरा आणि वडगांव परिक्षेत्रीय कार्यालयामार्फत कर वसुलीची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.



पथकात नियुक्त वरिष्ठ अधिकारी व वसुली कर्मचाऱ्यांनी थकीत करदात्यांना गृहभेटी दिल्यानंतरही जे थकितदार कर भरणार नाहीत अशा करदात्याविरुद्ध जप्तीसह दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्याधिकारी शुभम क्यात्तमवार यांनी वसुली पथकांना दिले आहेत.

तदनुसार कर वसुली विभाग वर्तमान पत्रातून थकितदारांची यादी जाहीर करणार असून त्यापूर्वीच वसुली पथकाने गृहभेट दिलेल्या करदात्यांनी थकीत व चालू कराचा भरणा करावा अन्यथा त्यांच्या विरोधात महाराष्ट्र न. प. व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

सदर संभाव्य व अप्रिय कार्यवाही टाळण्यासाठी थकितदारांनी आपल्याकडील मालमत्ता कराचा भरणा करावा असे आवाहन न. प. प्रशासनाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे.

# आता थकबाकीदार वीज ग्राहकांकडे बसविणार स्मार्ट मीटर

प्रतिनिधी १७ मार्च

### थकबाकी भरल्यावरच वीजपुरवठा सुरू

**यवतमाळ :** वीज बिल वसुलीसाठी महावितरणने आक्रमक भूमिका घेत थकबाकीदार ग्राहकांवर कठोर कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत थकबाकीदार ग्राहकांचे वीज मीटर काढून घेण्यात येत असून पुनर्जोडणी शुल्कासह शंभर टक्के थकबाकी भरल्यानंतरच वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. तसेच थकबाकीमुळे काढण्यात आलेल्या मीटरच्या ठिकाणी प्राधान्याने स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली.

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १५ दिवस शिल्लक असताना अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील सुमारे तीन लाख ग्राहकांकडे तब्बल ६०० कोटी रुपयांची वीज थकबाकी आहे. त्यामुळे वसुलीसाठी महावितरणने विशेष मोहीम सुरू केली असून थकबाकी न भरल्यास संबंधित ग्राहकांचे थेट वीज मीटर काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, मीटर काढल्यानंतर काही ग्राहकांकडून शेजाऱ्यांकडून अनधिकृतपणे वीज पुरवठा घेण्याचे प्रकार आढळत असल्याने महावितरणने याबाबत कठोर इशारा दिला आहे. शेजाऱ्याकडून वीज घेणे किंवा देणे हे विद्युत कायदा २००३ अंतर्गत गुन्हा असून संबंधित ग्राहकांसह अनधिकृतपणे वीज देणाऱ्या शेजाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

अनधिकृत वीज वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी महावितरणच्या भरारी पथकांकडून रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करण्यात येणार आहे. या गस्ती दरम्यान अनधिकृत वीज वापर आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वीज चोरी हा फौजदारी गुन्हा असून या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे.



वीजबिल वसुली मोहिमेत ग्राहकांनी थकबाकी भरून सहकार्य करावे तसेच कारवाईदरम्यान शासकीय कामात अडथळा आणू नये. अन्यथा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत.

# घरकुलच्या नावांवर ग्राहकांना रेती पुरवठा

प्रतिनिधी १७ मार्च

**वणी :** वणी तालुक्यातील सावरला रेती घाटावरुन घरकुल योजनेचा घरकुल धारकांना रेती पुरवठा करण्याचा तालुका महसूल विभागाने निर्णय घेतला परंतु याचा दुरुपयोग काही वाहनचालक घेतांना दिसत आहे

मागिल काही वर्षांपासून घरकुल धारकांना रेती मिळत नव्हती त्यांना जप्त केलेले रेती साठे यातुनच रेती मिळत होती परंतु ही रेती फार अल्प प्रमाणात असल्याने त्यांचे घरकुल पूर्णत्वास जात नव्हतेयाच कारणामुळे अनेक ग्रामपंचायत सरपंच , राजकीय पक्षांनी निवेदने, आंदोलने केली. या सर्वांचा परिणाम असा झाला की प्रशासनाला जाग आली व त्यांनी घरकुल धारकांना तालुक्यातील काही घाटासह सावर्ला घाटातून रेती वितरण सुरू केले.

उद्घाटनप्रसंगी काही महसूल अधिकारी हजर होते परंतु नंतर दिसेनासे झाले नेमके याच संधीचा फायदा घेऊन काही वाहनधारक त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या ज्यांना वाटप करण्यासाठी ठेवले




याचं संधीचा फायदा घेतला व मनमाणी सुरू केली वाहनधारका सोबत संगनमत करून सरळसरळ चिरीमिरी घेऊन वाहने सोडू लागले व थेट विक्री करायला लागले

अधिकारी वर्गाला असे वाटले आहे की ही रेती घरकुल धारकांना चांगली परंतु सत्य काही वेगळेच आहे ती रेती खुल्या बाजारात विक्री जातं असल्याचे गोपनीय माहिती मिळाली आहे या रेती वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहण्याची टोकण तपासणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# आरएसएस मुख्यालयावर वंचितचा मोर्चा; विविध मुद्द्यांवरुन आंदोलनाची घोषणा

प्रतिनिधी १७ मार्च

**यवतमाळ :** विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडी, तसेच केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली असून, येत्या २३ मार्च रोजी नागपूर येथील रेशीमबागमधील आरएसएस मुख्यालयावर मोर्चा व धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या संदर्भात यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ही माहिती दिली.



देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर विविध मुद्द्यांवर टीका केली. काही आंतरराष्ट्रीय प्रकरणांमध्ये भारतीय नेतृत्वाची नावे जोडली जात असल्याच्या चर्चांमुळे देशात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच परराष्ट्र धोरण, इंधन दरवाढ आणि शेतकरी प्रश्न यांसारख्या मुद्द्यांवरही त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या पार्श्वभूमीवर देशाच्या सार्वभौमत्व व पारदर्शकतेच्या मुद्द्यावर जनजागृती करण्यासाठी राज्यभर आंदोलनांची मालिका राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयासमोर मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र सरकारविरोधात जनतेचा आवाज बुलंद करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आंबेडकर यांनी सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. “लोकशाहीत प्रश्न विचारणे आणि भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढे येणे गरजेचे आहे,” असे ते म्हणाले. पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, डी. के. दामोदर, नगरसेविका मीरा वीर, संघपाल कांबळे, पोले, राजू निमसटकर, शैलेश भानवे, सचिन राऊत, अशोककुमार कयापाक, ॲड. संजय इंगळे, मिलिंद पाटील यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'त्या 'तरुणीची ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान

प्रतिनिधी १७ मार्च

**यवतमाळ :** कळंब तालुक्यातील तासलोट जंगल शेतशिवारात अर्धवट जळालेल्या व कुजलेल्या अवस्थेत एका तरुणीचे प्रेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत तरुणीची ओळख अद्याप पटलेली नसून तिची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

१५ मार्च रोजी सकाळी १० वाजण्यापूर्वी जंगल परिसरात अज्ञात महिलेचे प्रेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कळंब पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. प्रेत अर्धवट जळालेल्या व कुजलेल्या अवस्थेत असल्यामुळे चेहरा विद्रूप झाल्याने ओळख पटविणे कठीण झाले आहे.



मृत महिलेचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट, शरीरयष्टी सडपातळ व केस काळे आहेत. तिच्या अंगावर लाल रंगाचा प्लाझो व आकाशी रंगाचा टॉप असून त्यावर फिकट गुलाबी रंगाच्या फुलांचे डिझाईन आहे. घटनास्थळी हिरव्या रंगाची “MOST WALK” असे लिहिलेली चप्पल तसेच “SURE SHOT” असे लिहिलेल्या डायलचे घड्याळ आढळून आले आहे.

या प्रकरणी देवनाळा येथील विक्रम आत्माराम राठोड यांच्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात अपघात क्रमांक २४३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक महेंद्र साळवे करत आहेत.

दरम्यान, वरील वर्णनाशी साधर्म्य असलेली महिला किंवा मुलगी घरातून बेपत्ता असल्यास अथवा या संदर्भात कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी कळंब पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. १७ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# शिक्षण विभागात भ्रष्टाचाराचे अवलंबन...

# न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन !

## 'जाऊ तिथे खावू' लाच मान, न्यायालयाच्या आदेशाचा अवमान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम अनेक वर्षापासुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराच्या वाळवीने ग्रासलेले आहे. पैशाच्या हव्यासापोटी वाशीमच्या भ्रष्ट महिला शिक्षणाधिकाऱ्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाचाही अवमान करून आपली खाबूगिरी जगजाहिर करून त्रस्त शिक्षकावर अन्याय केल्याची अजब घटना उघड़कीस आली आहे. वाशीम तालुक्यातील उकळीपेन येथील विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षक असलेल्या भारत टोंचर यांना न्याय देन्याबाबतचा उच्च न्यायालयाचा आदेश असताना वाशीमच्या भ्रष्ट महिला शिक्षणाधिकाऱ्याने मागील साडेचार महिन्यापासून टोंचर यांना शालार्थ आयडी काढण्यासाठी आवश्यक असलेल्या शिफारस पत्रासाठी ताटकळत ठेवले असल्याचा अजब प्रकार उघड़कीस आला आहे.

जिल्ह्यात अनेक शिक्षक संघटना आहेत.काही शिक्षक संघटनेचे पदाधिकारी अनेक वर्षापासून भ्रष्ट अधिकाऱ्यांची पाठराखण करून स्वनामधन्य झाल्यासारखे वावरत असल्याचेही समजते.काही पदाधिकारी संस्थाचालक तर काही मुख्याध्यापक असल्याने त्यांना अधिकाऱ्यांची हुजरेगिरी करण्याचा छंद लागल्याची चर्चा आहे.

कथित संघटनेचे पदाधिकारी सकाळी भाषणात त्रस्त शिक्षकाला न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्नरत असल्याचे बोलतात,आणि रात्रीला त्यांना साक्षात्कार झाल्यावर ते कथित पदाधिकारी आपण सकाळी केलेले भाषण विसरून जातात,असाही प्रकार वाशीममध्ये होत असल्याची चर्चा आहे. त्या शिक्षकाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विभागीय शिक्षक नेत्या डॉ.संगीता शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे.त्यांना राजाश्रय असून त्यांच्याकडे सत्तेची कवचकुंडले सुद्धा आहेत.त्यांनी वाशीमच्या भ्रष्ट महिला शिक्षणाधिकाऱ्यांसह अमरावती विभागातील सर्व भ्रष्ट शिक्षण विभागातील अधाकाऱ्यांची एसआयटी मार्फत चौकशी लावून शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य जोपासण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता असल्याची मागणी जनतेकडून केल्या जात आहे.




**शिक्षक नेत्या डॉ. सौ. संगीता शिंदे (बोंडे) यांनी त्यांच्या फेसबुकवर शिक्षणधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मांगितल्याचा व्हिडीओ व्हायरल केला व शिक्षणधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावरून शिक्षण विभागात दाम दिल्याशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे.**

## शिक्षण अधिकारी, उपशिक्षणाधिकारी सह सर्वांचे भ्रष्टधोरण, शिक्षकांचे मरण..!

### पैसे न देता काम झालेले दाखवा अन् बक्षीस मिळवा

२०१३ पासून शिक्षण विभागाच्या बोगस भरतीच्या विरोधात बॅकडेट भरतीच्या विरोधात, शिक्षक समायोजनाच्या विरोधात सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्त मालिका लावल्या. कोण्या एकाच्या विरोधात कोण्या एकाच्या बाजूने कधीच वृत्त लिहिले नाही. भ्रष्टाचाराच्या विरोधात सत्याला न्याय देण्यासाठी मालिका चालविल्या आहेत. आणि यापुढेही न्यायासाठी सतत लढा कायम राहणार आहे. शिक्षण विभागाने सिटी न्युजच्या विरोधात अनेक खोटे गुन्हे दाखल केले आहेत. तरी सुध्दा सर्वच अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारांच्या विरोधात वृत्त मालिका चालवून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१३ पासून ज्या शिक्षणधिकाऱ्यांनी व उपशिक्षणाधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला त्यांच्या पुराव्यासहीत या अगोदर वृत्त मालिका लावल्या आहेत. शिक्षण विभागात आतापर्यंत एक नव्हेतर अनेकच शिक्षण अधिकारी , उपशिक्षणाधिकारी भ्रष्टाचारी आहेत. कोण्याच अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे पैसे न घेता शिक्षकांचे काम केले नाही. दाम दिल्या शिवाय काम होत नसल्याचे उघडच झाले आहेत. त्यामुळे कोण्या एकाची बाजू घेणे, कोण्या एकावर अन्याय करणे हे सिटी न्युजचे काम नसून अन्यायग्रस्तांना वृत्तातून पुराव्यासहीत न्याय देणे हेच काम आहे.


सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शिक्षण अधिकाऱ्यानी मांगितली ५० हजाराची लाच...
द्या दाम तरच काम, भ्रष्टाचारी त्याचं नाम !
भरती घोटाळ्याचा २०१४ पासुन सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...
दोन शिक्षण अधिकारी निलंबीत ,अनेक शाळांवर गुन्हे दाखल
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
जिल्ह्यातील शिक्षकांचे होतयं मरण...
एकीकडे राजकारण, दुसरीकडे अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण !
* जिल्ह्यासह विभागातील शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने बरबटलेला
* जिल्ह्यातील शिक्षक आमदार आणि शिक्षक संघटनांचे 'मौनव्रत'
* त्रस्त शिक्षकाची विभागीय शिक्षकनेत्याकडे धाव
सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. १६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
सरस्वतीच्या कार्यालयात लक्ष्मीदर्शन मोक्यात,
शिक्षण विभागाचे 'पावित्र्य' धोक्यात !
अनेक दलालाकडे 'वसूली' चे कंत्राट* संस्थाचालक, मुख्याध्यापकासह कर्मचारी हतबल...
भरती घोटाळ्याचा २०१४ पासुन सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...
दोन शिक्षण अधिकारी निलंबीत ,अनेक शाळांवर गुन्हे दाखल

## भरती घोटाळ्याचा २०१४ पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती. तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून

### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत ,अनेक शाळांवर गुन्हे दाखल

वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले. नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे ,तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे. या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.

## थोडक्यात

### तुळजापूर येथे दोन दिवसीय कार्यशाळा



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शहरा लागत असलेले तुळजापूर येथील दिव्यांग निवासी विद्यालय येथे दिनांक १२/ ०३/ २०२६ ते १३/०३/ २०२६ या दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न करण्यात आली. जिल्हा शिक्षण अधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद वाशिम व गट शिक्षण अधिकारी मंगरूळपीर यांच्या आदेशानुसार दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ नुसार सर्व समावेशित शिक्षण उपक्रमामध्ये २१ दिव्यांगांचे प्रकार असून सामान्य शाळेत प्रवेशित दिव्यांग विद्यार्थी यांना शिक्षण कशा पद्धतीने द्यायचे याबाबत कार्यशाळा मध्ये सखोल मार्गदर्शन करण्यात आले . सामान्य शाळेतील शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्यावर चर्चा करण्यात आली . कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून डॉ. पृथ्वीसिंग साबळे , उमेश कटके मानोरा ,नीरज घोरदळे कारंजा, प्रसाद तळेगावकर मानोरा,संतोष खाडे,कु. मनीषा खाडे ,रत्नपाल मेश्राम ,विद्यालयाचे प्राचार्य अभिजीत बी राठोड व विद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यशाळाला तालुक्यातील सर्व शिक्षकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात-मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी साहेब मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत असून बंदोबस्त करण्याची केली आहे.

मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, कारंजा रोड, आंबेडकर चौक, बसस्थानक चौक व मानोरा रोड व ,पोस्ट ऑफिस रोड इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे तसेच या तील अनेक भागात मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला असतो त्यामुळे रहदारिस मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे.त्यामुळे शहरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अतिशय आवश्यक आहे. तरी



मुख्याधिकारी साहेब यांना विनंती की, त्यांनी पालिका प्रशासन मार्फत आवश्यक कार्यवाही व व्यवस्था करून शहरातील मोकाट गुरांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## उन्हाची तीव्रता वाढल्याने रस्त्यावर शुकशुकाट







● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून उन्हाची तीव्रता वाढल्याने दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. सद्यस्थितीत उन्हाचा पार ४० अंशावर गेला असल्याने आगामी काळात उन्हाच्या झळा वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत आहे. उन्हाची तीव्रता अचानक वाढल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत असून कुलरचा वापर वाढला आहे.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच कडाक्याचे ऊन जाणवत असल्याने त्याचा परिणाम वाहतूक, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामकाजावर होत असल्याने जनजीवन प्रभावित झाले आहे. दुपारी बारानंतर उन्हाचे चटके जाणवत असल्याने कामानिमित्ताने घराबाहेर पडणारे नागरिक उन्हापासून सुरक्षिततेची काळजी घेवून बाहेर पडत आहेत. वाढत्या उन्हाचा परिणाम वाहतूक वर्दळीसह हातगाडीधारक विविध वस्तू विक्रेते तसेच फेरीवाले यांच्या व्यवसायावर देखील झाला आहे. दुपारच्या वेळी उन्हाचे चटके सहन करावे लागत असल्यामुळे मुख्य रस्त्यावरची वाहतूक विरळ झाल्याचे चित्र दिसून येते आहे. दरदविशी देवदर्शनासाठी भाविकांच्या गर्दीमुळे भरगच्च होणारी मंदिरे उन्हामुळे दुपारच्या वेळी ओस दिसून येत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच नागरिकांना उन्हाची तीव्रता सहन करावा लागत असून जिवाची लाहीलाही होत असल्याचे चित्र आहे.मागील आठवड्यापासून उन्हाच्या तिव्रतेत काही प्रमाणात वाढ झाली. पुढील आठवड्यात उन्हाच्या पारा ४२ ते ४३ अंशावर जाण्याची शक्यता आहे.त्यामुळे नागरीकांनी अत्यावश्यक कामासाठीच दुपारच्या वेळी घराबारहेर पडावे. अशावेळी उन्हापासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी. उष्माघाताची शक्यता वाटत असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उन्हाची तिव्रता पाहता नागरीकांनी आरोग्य जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- बाळासाहे बोराडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी,वाशीम उन्हाची तीव्रता वाढल्याने थंडगार लस्सी, ताक , मठ्ठा, शीतपेय बर्फ गोळा या वस्तूंना मागणी वाढली आहे.दुपारच्या वेळी गावखेड्यासह शहरातील गल्लीबोळात ऊसाचा रस, आईस्क्रीम, बर्फ गोळे विक्रेते फिरताना दिसून येत आहेत.

### संतुलीत आहार ठेवा

उन्हाळा येऊन दाखल झाला आहे. तापमानातही परिवर्तन व्हायला सुरुवात झाली आहे. तप्त दुपार आणि गरम हवा शरीरावरही परिणाम करतेच. त्यामुळे उन्हाळा आल्यानंतर तुमच्या जेवणाच्या दिनचर्येतही बदल गरजेचा आहे.उन्हाळयात अधिक तेलकट खाणे नुकसानदायक ठरू शकते. त्यामुळे संतुलित आहाराची आवश्यकता असते. दिवसाची सुरुवात एक लीटर पाणी किंवा लिंबू पाण्याने करा. दिवसभर जास्तीत जास्त पाणी पिणेही आवश्यक असते.

# आणखी एक महाघोटाळा, भ्रष्टाचाराला कधी बसेल आळा !

## सन २०२३-२४ नुकसान भरपाई संशयाच्या भोवऱ्यात.

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारण्याचे धक्कादायक प्रकार पुन्हा पुन्हा उघडकीस येत आहेत. जिल्हाभर खळबळ उडवून देणाऱ्या पोकरा घोटाळ्याची फेरचौकशी करण्याची मागणी होत असतांनाच आता एका नव्या घोटाळ्याची माहिती समोर येत आहे. सन २०२३-२४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने शासनाकडून करोडो रुपयांचा मदत निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र नेहमी प्रमाणे इथेही भ्रष्टाचाराचा शिरकाव झाला. आणि क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठराविक दलालांमार्फत लाखों रुपयांची अफरातफर केली असल्याची माहिती हाती आली आहे. पोकरा नंतर आणखी एक महाघोटाळा उघड होण्याची शक्यता वर्तवली जात असून प्रत्येक शासकीय योजनेत सातत्याने होणाऱ्या भ्रष्टाचारास आळा कधी बसेल? असा प्रश्न उपस्थित केला जात असून या गंभीर प्रकाराची लवकरच तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.









जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा घोटाळ्याने कृषी विभागाची झोप उडवून दिली आहे. या प्रकरणातील काही बाबींची तपासणी करून अहवाल सादर करण्यात आला आहे. तर उर्वरित चौकशी सुरू असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात येत आहे. फळबाग लागवड प्रकरणात वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र महत्वाच्या अनेक मुद्द्यांची चौकशी होणे बाकी आहे. यात क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी दोषी आहेत का ? याची चौकशी सुरू असून सदर तपास मालेगावचे तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या पोकरा घोटाळ्याने रिसोड तालुक्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यातच आता पुन्हा एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. ती म्हणजे अवकाळी नुकसान भरपाई अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे पुरावे समोर आले आहेत.

हाती आलेल्या माहितीनुसार २६ नोव्हेंबर २०२३ ते २८ नोव्हेंबर २०२३ दरम्यान जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने थैमान घातले होते. त्यात रिसोड तालुक्याचा सुद्धा समावेश होता. परिणामी तालुक्यातील अनेक गावात शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अशा परिस्थितीत हतबल झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने अनुदानासाठी निधी उपलब्ध करून दिला होता. मात्र सदर अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणावर अफरातफर करण्यात आली असल्याचे वास्तव उघडकीस येत आहे. यात अनेक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना डावलण्यात आले असल्याची माहिती समोर येत आहे. शिवाय पंचनामे, त्याचे निकष सर्व धाब्यावर बसवून मनमानी वाटप करण्यात आला असल्याचे बोलले जात आहे.परिणामी स्थानिक पातळीवरील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी लाखों रुपयांचा मलिदा लाटला असल्याची चर्चा आता जोर धरत आहे. या बाबत लवकरच महसूल व कृषी विभागाच्या वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### रिसोड तालुका भ्रष्टाचाराच्या रडारवर...

बहुचर्चित पोकरा गैरप्रकरणाने कृषी विभागाच्या पारदर्शकतेवर प्रश्चिन्ह निर्माण झाले आहे. त्यातच दोषींवर धडक आणि तातडीने कारवाई न झाल्यामुळे बुड ते शेंडा पाणी मुरले असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. परिणामी कृषी विभागाच्या या कार्यप्रणालीमुळे नुकत्याच सुरू झालेल्या पोकरा भाग - २ या योजनेच्या पारदर्शकतेवर सुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यातच आता नव्याने सन २०२३ च्या नुकसान भरपाई वाटपातील गैरप्रकार उघड होत आहे. सदर प्रकरणाची तक्रार दाखल झाली तर जिल्ह्यातील एक मोठा महाघोटाळा समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे सद्यस्थितीत तरी रिसोड तालुका भ्रष्टाचाराच्या रडारवर असल्याचे बोलले जात आहे.

## कुंभी येथे खुलेआम वरली मटका पोलिस केव्हा देणार कारवाईचा चटका !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



तालुक्यातील व आसेगाव पोलीस स्टेशन लगत व एक हाके वर असलेल्या कुंभी येथे राजेरोसपणे शामियाना टाकून वरली व जुगार जोमात चालू मात्र पोलिसांचे दुर्लक्ष असल्याने वरली बहाद्दर म्हणतात आमचे कोन्ही काही करू शकत नाही.संपूर्ण जिल्हा बंद असला तरी पण आम्ही चालू ठेवतो आम्हाला वरदहस्त पोलीस प्रशासनाचा म्हणून अवैध धंदे खूप मोठ्या प्रमाणात चालू असून त्यांच्याकडे प्रशासनाच दुर्लक्ष का असाव काही प्रश्न मनाला भेडसावत आहे .कुंभी बस स्टॅन्ड ला लागून मोठ्या प्रमाणात जुगार अड्डा चालू असून त्यांच्याकडे कोणत्याच अधिकाऱ्यांचे लक्ष नसून डोळे झाक केल्या जात आहे. मटका बाजार राजरोसपणे चालू आहे तरी याकडे लक्ष नसून कारंजा लाड , कन्हेरगाव नाका वशिम येथून येऊन मटका चालवितात असे सुद्धा नागरिकांमध्ये बोलल्या जाते. आजूबाजूला वस्ती त्या वस्तीत शिक्षण घेणारी मुलं यावर काय परिणाम होऊ शकतो हा सुद्धा चिंतेचा भाग आहे. गावकरी मंडळी सुद्धा त्रस्त झाले आहे. तरी सुद्धा अवैध धंदे बंद होण्याचे नावाचं नाही तर म्हणून मा. पोलीस अधीक्षक साहेब यांनी लक्ष घालून यावर आळा बसेल का काही सुज्ञ नागरिकांनी अनेक वेळा धाडी टाकून अवैद्य धंदे बंद होत नसतील तर याला अभय कोणाचे समजावे हा सुद्धा प्रश्न नागरिकांना पडत आहे. बंद होणार का या कडे जनतेचे लक्ष वेधले आहे परिसरातअवैध दारू सुद्धा विक्री चालू असून दारूमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहे. मागील काही महिन्यां पासून आशेगाव पोलिस स्टेशन च्या आंतगत असलेल्या कुंभी या येथे प्रशासकीय राजकीय.आशिर्वादाने व्यवसायाची खुलेआम सट्टापट्टी बनविली जात आहे. यात सट्टा लावणाऱ्याची संख्या मोठी असून अनेकांचे संसार उघड्यावर येत आहे.म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. अवैध दारू विक्री सह आता परिसरात जुगार, मटका व्यवसायाला ही तेजी आल्याचे चित्र दिसून येत आहे. मटका घेणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने वरिष्ठांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी सामान्य नागरिकांतून केल्या जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. १७ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत डॉ. विशाल कोरडे यांचे व्याख्यान

**अकोला :** स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे दिव्यांगांच्या शिक्षण , रोजगार व आरोग्यासाठी संपूर्ण भारतभर सामाजिक उपक्रम राबवत आहेत. . शालेय शिक्षण व क्रीडा विभाग जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला तर्फे दि. १२ ते १४ मार्च २०२६ दरम्यान बी.आर.हायस्कूल येथे जिल्ह्यातील शिक्षकांची कार्यशाळा घेण्यात आली होती . सदर कार्यशाळेत समग्र शिक्षा समावेशित शिक्षण प्राथमिक अंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी शैक्षणिक साहित्याची खरेदी विकसन करण्यासाठी या विषयावर व्याख्यान व प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाचे संस्थापक अध्यक्ष व श्री शिवाजी महाविद्यालय अकोला चे सहयोगी प्राध्यापक डॉ.विशाल कोरडे यांना आमंत्रित केले होते . डॉ.कोरडे यांनी दिव्यांगत्वाचे २१ प्रकार, दिव्यांग विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी, त्यावरील उपाययोजना व शिक्षकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले .

# निकृष्ट रस्त्यांविरोधात शिवसेनेची 'गांधीगिरी' सत्कार

### ◆ कार्यकारी अभियंत्यांना शाल-श्रीफळ देऊन केला निषेध

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यात झालेल्या रस्ते कामांमधील कथित भ्रष्टाचार आणि निकृष्ट दर्जा उघड करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने अनोखे 'गांधीगिरी' आंदोलन केले. अवघ्या सहा महिन्यांत ४६ कोटी रुपयांचे रस्ते उखडल्याने संतापलेल्या शिवसैनिकांनी कार्यकारी अभियंता निलेश वानखडे यांचा शाल व श्रीफळ देऊन उपरोधिक 'सत्कार' केला.या आंदोलनात जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्यासह विकासराव पागृत, सुरेंद्र विसपुते, आशिष गावंडे, राहुल कराळे यांसह



अनेक आजी-माजी नगरसेवक आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जिल्ह्यात तीन महत्त्वाचे सिमेंट काँक्रीटचे रस्ते तब्बल ४६.४० कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आले होते. मात्र, अवघ्या सहा महिन्यांतच या रस्त्यांना मोठमोठ्या भेगा पडल्या असून काँक्रीट उखडल्याने रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे.निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि या रस्त्याची पुन्हा दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. जर कारवाई झाली नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

### पोलीस प्रशासनाची दिशाभूल केल्याचा आरोप

जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात प्रशासनावर तीव्र टीका करण्यात आली. घुसर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत उपजिल्हाप्रमुख विकास पागृत यांनी तक्रार केली होती. मात्र, भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्यासाठी कंत्राटदाराने शिवसैनिकांविरुद्ध अकोटफैल पोलीस ठाण्यात खोटी तक्रार देऊन पोलीस प्रशासनाची दिशाभूल केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

### 'रस्ता आहे की काकडी ?' - गोपाल दातकर

अकोला तालुक्यातील बाभुळगाव ते गुडधी, घुसर आणि उगवा या रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून कोट्यावधी रुपये मंजूर झाले होते. या रस्त्याचे काम सहा महिन्यांपूर्वीच पूर्ण झाले. मात्र, पहिल्या सहा महिन्यांतच रस्त्याला ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडल्या आहेत. या भेगा इतक्या भयानक आहेत की त्यामध्ये दुचाकीचे चाक अडकून अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.
आंदोलनादरम्यान बोलताना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांनी संताप व्यक्त केला. 'हा रस्ता आहे की काकडी? सहा महिन्यांतच रस्ता अक्षरशः चिरला गेला आहे. निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात आले आहेत,' अशी टीका त्यांनी केली. विशेष म्हणजे, या रस्त्यावर अवजड वाहतूक नसल्याचा दावा स्थानिक करत असतानाही, अधिकारी मात्र वाहतुकीचे कारण देऊन हात झटकत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.


मुख्यमंत्र्यांच्या नावे असलेल्या योजनेत भ्रष्टाचार !
पूर्ण रस्त्यावर केमिकल मलमपट्टीने उघडे पाडले सर्वच निकृष्ट काम ▸▸ साईटवरील ज्युनिअर ते कार्यकारी अभियंत्यांची चौकशी करण्याची गरज
21 कोटींच्या सिमेंट रस्त्यावर हजारो भेगा
भ्रष्टाचाराचा 'सिमेंट' महामार्ग!
अकोल्यात जनतेच्या २१ कोटींची होळी !

### तीन रस्त्यांची झाली पोलखोल

बाभुळगाव ते गुडधी-अलियाबाद-घुसरः १०.७५ किमी रस्ता (खर्च २१ कोटी रुपये)
उगवा ते घुसरः ६ किमी रस्ता (खर्च १२ कोटी रुपये)
दोनवाडा रस्ताः ७.१० किमी रस्ता (खर्च १३.६७ कोटी रुपये)

### शिवसेनेच्या प्रमुख मागण्या आल्या समोर

१. निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे.
२. कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा.
३. संबंधित कंत्राटदाराकडूनच स्वखर्चाने दर्जेदार पद्धतीने रस्ते नव्याने करून घ्यावेत.
४. तोपर्यंत कंत्राटदाराला कोणताही अतिरिक्त निधी देऊ नये.

## अकोल्यात रामनवमीचा उत्साह पोहचला शिगेला

### ◆ ५० हजार लक्ष्मीनारायण मूर्तींचे होणार वाटप

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** श्रीराम नवमी शोभायात्रा' उत्सव यंदाही अकोला महानगरात मोठ्या थाटामाटात साजरा होणार आहे. १८ मार्चपासून सुरू होणाऱ्या या नऊ दिवसीय महोत्सवात धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची मोठी रेलचेल असणार असून, ५० हजार भाविकांना लक्ष्मीनारायण मूर्तींचे विनामूल्य वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा शोभायात्रा समितीने केली आहे.

'अकोला शहराचे आराध्य दैवत आणि श्रद्धेचे स्थान असलेल्या श्रीराम नवमी शोभायात्रेची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. विश्व हिंदू परिषद आणि श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने यंदाही भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १८ मार्चपासून खंडेलवाल भवन येथून या उत्सवाचा प्रारंभ होणार आहे. विशेष म्हणजे, यंदा



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ५० हजार लक्ष्मीनारायण मूर्तींचे वाटप आणि २५ फुटी भव्य नरसिंह अवतार झाकी हे या उत्सवाचे मुख्य आकर्षण असणार आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने अकोला शहर 'राममय' होणार असून प्रशासकीय आणि सामाजिक स्तरावर जय्यत तयारी सुरू आहे. खंडेलवाल भवन येथे 'गजर गजाननाचा' सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्सवाचा प्रारंभ होईल. सिटी कोतवाली चौकात वृंदावनच्या कलाकारांची 'भव्य कृष्णलीला' नाटिका सादर होतील. वारकरी मंडळाचा अभंग आणि टाळ-मृदंगाचा गजर केला जाईल. संगीतभजन आणि २३ मार्च रोजी महाकाल पथकाद्वारे संगीतमय सादरीकरण होतील. २५ फुटी नरसिंह झाकी आणि मूर्ती वितरण करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या नियोजनासाठी समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा गोवर्धन शर्मा, अध्यक्ष अरुण शर्मा, राजू मंजुळकर, राहुल राठी, गणेश काळकर यांसह विहीप आणि शोभायात्रा समितीचे असंख्य पदाधिकारी व मातृशक्ती मोठ्या संख्येने परिश्रम घेत आहेत.

## अकोला जिल्ह्यातही होणार खासगी दस्त नोंदणी कार्यालय

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** राज्य सरकारने नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाला राज्यात ६० खासगी दस्त नोंदणी कार्यालये सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात पाच ठिकाणी अशी खासगी दस्त नोंदणी कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत. त्यात मुंबईत दोन तर पुणे, ठाणे, व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी एक कार्यालय सुरू करण्यात येणार आहे.

या योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात अकोला जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यालयात सरकारी दुय्यम निबंधक व एक वरिष्ठ लिपिक वगळता अन्य सर्व कर्मचारी संबंधित कंपनीचे असणार आहेत. 'व्हीएफएस' ग्लोबल या कंपनीला राज्यात ६० खाजगी दस्त नोंदणी कार्यालय सुरू करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात होणारी गर्दी, अपुऱ्या सुविधा, आणि वेळेचा अपव्यय या बाबी लक्षात घेऊन नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाने ६० ठिकाणी अशी कार्यालय सुरू करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली होती. या कंपनीला कार्यालयात दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी सोफासेट, वातानुकूलित यंत्रणा, स्वच्छतागृहाची सोय, तसेच नोंदणीला वेळ लागणार असल्यास चहा कॉफीची व्यवस्था करावी लागेल. यासाठी नागरिकांना सेवाशुल्क द्यावे लागणार आहेत. प्रत्येक दस्तासाठी ५ हजार २१७ रुपये ९६ पैसे भरावे लागतील.

## गुढीपाडव्याला निघणार 'हिंदू नववर्ष स्वागत यात्रा' ; संस्कृती संवर्धन समितीचा पुढाकार

### ◆ संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संवर्धन समितीमार्फत विशेष स्पर्धांचे आयोजन



प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** शहरात सांस्कृतिक कार्याचा वारसा जपणारी 'संस्कृती संवर्धन समिती' यावर्षीही हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी सज्ज झाली आहे. येत्या १९ मार्च रोजी, चैत्र शुक्ल प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अकोल्याचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरातून भव्य 'हिंदू नववर्ष स्वागत यात्रे'चे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक हॉटेल ग्रीड लँड येथे आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी ही माहिती दिली.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून यावर्षी यात्रेत सहभागी होणाऱ्या नागरिकांसाठी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये थोर महापुरुष आणि आद्य क्रांतिकारकांच्या वेशभूषेवर आधारित स्पर्धा तसेच युवा पिढीमध्ये राष्ट्रभावना वृद्धिंगत करण्यासाठी 'लेखन स्पर्धा' घेतली जाणार आहे. या उपक्रमाला संपूर्ण जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नव वर्ष स्वागत यात्रा सकाळी ७ वाजता राज राजेश्वर मंदिरातून मार्गस्थ होईल. बिर्ला राम मंदिर येथे रामरक्षा पठणाने यात्रेचा समारोप होईल.या ऐतिहासिक सोहळ्यात अकोलेकरांनी पारंपारिक वेशभूषेत, सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे. याप्रसंगी ब्रिजमोहन चितलांगे, डॉ. आर.बी. हेडा, रामप्रकाश मिश्रा यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

## फायरिंग रेंजमध्ये अपघात ; राउंड ब्लास्टमुळे हेड कॉन्स्टेबल गंभीर जखमी

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** पातूर येथील पोलिस फायरिंग रेंजमध्ये प्रशिक्षणादरम्यान धक्कादायक अपघात घडला. नियमित फायरिंग सराव करत असताना अचानक राउंड ब्लास्ट झाल्याने अकोला पोलीस मुख्यालयातील हेड कॉन्स्टेबल राजकुमार ठाकरे गंभीर जखमी झाले.

पोलीस फायरिंग रेंजमध्ये प्रशिक्षणादरम्यान झालेल्या अपघातामुळे पोलीस विभागात खळबळ उडाली. नियमित शस्त्र हाताळणी आणि नेमबाजी प्रशिक्षणादरम्यान अचानक राउंड ब्लास्ट झाल्याने अकोला पोलीस मुख्यालयातील हेड कॉन्स्टेबल राजकुमार ठाकरे गंभीर जखमी झाले.या स्फोटात त्यांच्या हाताच्या तीन बोटांना गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेनंतर पोलीस विभागात खळबळ उडाली असून सुरक्षा मानकांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.



अकोला पोलीस विभागाकडून दरवर्षी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी फायरिंग प्रशिक्षण आयोजित केले जाते. या प्रशिक्षणाचा उद्देश शस्त्र हाताळणीतील कौशल्य वाढवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे हा असतो.सोमवारी पातूर येथील अकोला फायरिंग रेंजमध्ये अशाच प्रकारचा सराव सुरू होता. प्रशिक्षणादरम्यान हेड कॉन्स्टेबल राजकुमार ठाकरे हे बंदुकीतून गोळी झाडण्याचा सराव करत होते. याच वेळी अचानक बंदुकीतील राउंड ब्लास्ट झाल्याची माहिती समोर आली.घटनेदरम्यान झालेला स्फोट इतका तीव्र होता की हेड कॉन्स्टेबल राजकुमार ठाकरे यांच्या हाताच्या तीन बोटांना गंभीर दुखापत झाली.

## गट शिक्षणाधिकाऱ्यासह पाच शिक्षक निलंबित

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या आंतरजिल्हा शिक्षक बदली प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे उघडकीस आले असून, या प्रकरणात प्रभारी गट शिक्षणाधिकाऱ्यासह पाच शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. दिव्यांग संवर्गातून बदलीचा लाभ मिळवण्यासाठी खोटी व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा परिषद अकोला अंतर्गत शिक्षकांच्या बदली प्रक्रियेवरून यापूर्वीही वाद निर्माण झाले आहेत. यावेळी शिवनगर येथील गणेश गजाननराव कुरई यांनी केलेल्या तक्रारीनंतर शिक्षण विभागाने या प्रकरणाची दखल घेत चौकशीचे आदेश दिले होते. शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित पंचायत समितींच्या गटविकास अधिकाऱ्यांना त्रिस्तरीय स्वतंत्र चौकशी समिती त्यानुसार स्थापन करण्याचे निर्देश दिले. या निष्काळजीपणामुळे अपात्र शिक्षकांनाही बदलीचा लाभमिळाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी बाळापूरचे विस्तार अधिकारी (शिक्षण) तथा प्रभारी गट शिक्षणाधिकारी दिनेश दुतंडे, निमकरदा येथील सहाय्यक शिक्षक श्रीकांत वानखडे, वाडेगाव येथील सहाय्यक शिक्षक हमीद हुसेन लियाकत हुसेन, अकोट येथील सहाय्यक शिक्षक ज्ञानेश्वर भोयर तसेच अकोला येथील सहाय्यक शिक्षक राजेंद्र पुंजाजी ताडे यांच्यावर सदरची कारवाई करण्यात आल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी सिटी न्यूजशी बोलताना दिली.

## आयएएस रेणुका केकन आणि निशा ढोणे यांचा जंगी सत्कार

### ◆ आलेगावात भव्य मिरवणूक काढून स्वागत

प्रतिनिधी १७ मार्च

**आलेगाव :** पातूर तालुक्याच्या मातीतून घडलेल्या दोन मुलींच्या उल्लेखनीय यशाने संपूर्ण परिसर अभिमानाने भारावून गेला आहे. पातूर येथील जिल्हा परिषद शिक्षकाची मुलगी रेणुका दिनेश केकन यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले, तर आलेगाव येथील शेतकऱ्याची मुलगी निशा गणेशराव ढोणे यांनी एमपीएससी परीक्षेत यश मिळवून जिल्हा कृषी अधीक्षक वर्ग एक पदावर नियुक्ती मिळवली आहे. ग्रामीण भागातील या दोन कन्यांच्या उज्ज्वल यशाबद्दल आलेगाव येथे वंजारी समाजाच्या वतीने भव्य मिरवणूक काढून त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

या दोघींच्या यशाचा गौरव करण्यासाठी आलेगाव येथील वंजारी समाज व ग्रामस्थांच्या वतीने गावातून



भव्य मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदुंगाच्या गजरात गावकऱ्यांनी फुलांच्या वर्षावात आणि जयघोषात त्यांचे स्वागत केले. यानंतर आयोजित जाहीर सत्कार समारंभात दोघींना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे राज्य प्रवक्ते विनोद वाघ होते, तर प्रमुख अतिथी म्हणून वाशिम येथील अप्पर जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे होते. विनोद वाघ म्हणाले, ग्रामीण भागातील मुली आज शिक्षणाच्या बळावर देशाच्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. दोन्ही मुलींच्या यशामागे त्यांचे कुटुंब, शिक्षक आणि समाजाचे संस्कार आहेत. ग्रामीण भागातही प्रचंड बुद्धिमत्ता आणि क्षमता आहे, फक्त योग्य मार्गदर्शन आणि परिश्रमाची जोड मिळाली तर कोणतेही ध्येय गाठता येते हे दाखवून दिले. अप्पर जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे म्हणाले, अधिकारी झाल्यानंतर जबाबदारी मोठ्या प्रमाणात वाढते. पद मिळवणे ही मोठी गोष्ट असली तरी त्या पदावर राहून जनतेला न्याय मिळवून देणे हेच खरे कर्तव्य असते. दोघींचे नेत्रदीपक यश तालुक्यातील युवक युवतींसाठी प्रेरणादायी ठरले आहे. दोघींचे पालकही सत्कार सोहळ्याला उपस्थित होते.

## शहर सुशोभीकरणाला वेग स्टेशन ते अग्रसेन चौक मार्ग उजळला

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** शहरात सुशोभीकरणाच्या कामांना वेग आला असून, रेल्वे स्टेशनपासून अग्रसेन चौकापर्यंतच्या मार्गावर आकर्षक लाईटिंग आणि हरितीकरण करण्यात आले आहे. या कामामुळे शहराचा चेहरामोहरा बदलताना दिसत असून, विशेषतः रात्रीच्या वेळी हा परिसर अधिक आकर्षक दिसत आहे. अकोला शहरात सध्या सुशोभीकरणाच्या विविध कामांना गती मिळाली आहे. विशेषतः रेल्वे स्टेशनपासून अग्रसेन चौकापर्यंतच्या मुख्य मार्गावर डिव्हायडरवर हरितीकरण करण्यात आले असून, आकर्षक लाईटिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. या कामामुळे संपूर्ण मार्ग अधिक सुंदर आणि व्यवस्थित दिसू लागला आहे. डिव्हायडरवर लावण्यात आलेली झाडे आणि सजावटीची लाईट्स रात्रीच्या वेळी विशेष आकर्षण ठरत आहेत. त्यामुळे या भागाचा नाईट व्ह्यू अधिकच खुलून दिसत आहे.नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत केले जात असून, शहराच्या सौंदर्यात भर पडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## देशमुख महिला मंडळाचा सामाजिक बांधिलकी जोपासणारा पाणपोई उपक्रम

प्रतिनिधी १७ मार्च

**अकोला :** 'काय उपयोग संपत्तीचा जर थेंबही नसेल पाण्याचा'! पाणी म्हणजे जल , निर , उदक कितीतरी शब्द पण पाण्याला जीवन म्हणणेच अगदी योग्य वाटते. पाण्याशिवाय मनुष्य जीवनाचा विचार करणेच अशक्य. पृथ्वीवरील पाण्याचे अस्तित्वच या सृष्टीचा पाया आहे. आणि म्हणूनच दर महिन्याला सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या देशमुख महिला मंडळाच्या वतीने अतिशय उपयुक्त असा उपक्रम दिनांक १४ मार्च २०२६ ला श्री शिवाजी महाविद्यालयाच्या बाहेर या प्रखर आणि जीवघेण्या गर्मीमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरू , विद्यार्थी,




कष्टकरी लोकांना थंड आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे आणि त्यांची तृष्णा तृप्ती व्हावी या हेतूने पानपोई लावण्यात आली. या उपक्रमाची जबाबदारी मंडळाच्या मंगलगिरी ग्रुप कडे होती. कार्यक्रमाला मंडळाच्या माननीय अध्यक्ष राजश्रीताई , सचिव स्वप्नाली ताई , कोषाध्यक्ष प्रतिभाताई , ज्येष्ठ सल्लागार कविताताई आणि सीमाताई उपस्थित होत्या. उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मंगलगिरी ग्रुपच्या ग्रुप लीडर राखी महल्ले, प्रतिभा , वैशाली , सपना, प्रियांका , सुजाता , कोमल , रूपाली , नीता , डॉ. अनुजा , मोहिनी , साधना , सविता , किरण , अर्चना , अनुराधा , मनीषा , साधना ,वैशाली मोहोळ ,डॉ. श्रद्धा टाले, सुचिता आशा देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK